cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२५९ | शुक्रवार दि.१६ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### प्रतिष्ठेसोबत अस्तित्वाचाही प्रश्न !

महाराष्ट्रातील २९ महापालिकांसाठी गुरूवारी निवडणूक पार पडली. देशातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई महापालिकेसाठीही मतदान झाले. मुंबई पालिकेवर आपला झेंडा फडकावा, यासाठी राज्यातील सत्ताधारी भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेचा प्रयत्न आहे.

# नमो शेतकरी योजनेचे पैसे पुढच्या महिन्यात जमा होणार!

## कृषी विभागाने वित्त विभागाकडे मागितला १ हजार ९३० कोटी रुपयांचा निधी

मुंबई । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. शेतकऱ्यांना पुढच्या महिन्यात म्हणजेच फेब्रुवारीमध्ये २००० रुपये मिळणार आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जाणार आहेत. केंद्र सरकारसह राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी अनेक योजन सुरू केल्या आहेत. यामध्ये आता योजनेचा हप्ता फेब्रुवारीमध्ये दिला असल्याचे समोर आले आहे.**




केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी पीएम किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे. या योजनेत वर्षभरात ६००० रुपये दिले जातात. दरम्यान, याच पार्श्वभूमीवर राज्य सरकारनेही नमो शेतकरी योजना सुरू केली आहे. या योजनेतदेखील शेतकऱ्यांना वर्षाला ६००० रुपये दिले जातात. या योजनेत प्रत्येकी २००० रुपये असे तीन हप्ते दिले जातात. या योजनेत आता शेतकऱ्यांना नमो शेतकरी योजनेचा हप्ता पुढच्या महिन्यात मिळणार आहे. राज्यातील ९१ लाख ९७ हजार शेतकरी या योजनेचा लाभ घेतात. या योजनेच्या पुढील हप्त्यासाठी कृषी विभागाने वित्त विभागाकडे १ हजार ९३० कोटी रुपयांचा निधी मागितला आहे. हा निधी मंजूर झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. पुढच्या महिन्यात म्हणजेच ५ फेब्रुवारीला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका आहेत. या निवडणुकीआधी शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. निधी मंजूर झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकगययांच्या खात्यात पैसे जमा केले जातील.

# ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग? भाजप-शिंदे युतीला बहुमताचा अंदाज

## मुंबई मनपा एक्झिट पोलचा धक्कादायक दावा



मुंबई । प्रतिनिधी

राज्यभरात महिन्याभरापासून महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरु होती. महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नाशिक, ठाणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर या महापालिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सर्व २९ महापालिकांच्या निवडणुकांचा निकाल शुक्रवारी समोर येईल. पण त्याआधी ▶▶ पान २ वर

### » पुण्यात अजित पवारांना धक्का, भाजपची सत्ता?

मुंबई ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग लागणार असल्याचा अंदाज येत असतानाची मुंबईनंतर सर्वांचे लक्ष लागलेल्या पुणे महापालिकेतही भाजपच सत्ता काबिज करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. अजित पवारांनी येथील निवडणूक अतिशय प्रतिष्ठेची केली होती. त्यामुळे, येथील निवडणुकीकडेही राज्याचे लक्ष लागले होते. अखेर, निवडणूक निकालानंतरच खरे चित्र स्पष्ट होईल. मात्र, एक्झिट पोलचे आकडे ठाकरे बंधूंना आणि ते पवारांना धक्का देणारे आहेत. पुणे महापालिकेच्या १६२ जागांपैकी ९० पेक्षा जास्त जागा जिंकून भाजपच सर्वात मोठा पक्ष ठरेल, असा अंदाज प्राबने वर्तवला आहे. तर, पिंपरी चिंचवड महापालिकेतही भाजपचीच सत्ता येईल, असा अंदाज आहे.

# १५,९०८ उमेदवारांचे राजकीय भवितव्य 'ईव्हीएम'मध्ये बंद !




मुंबई/पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील २९ महानगरपालिकांच्या २,८६९ जागांसाठी गुरूवारी मतदानाचा धुरळा उडाला असून, एकूण १५,९०८ उमेदवारांचे राजकीय भवितव्य आता ईव्हीएममध्ये बंद झाले आहे. रविवारी (१६ जानेवारी) सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरू होणार असून, संपूर्ण राज्याचे लक्ष निकालाकडे लागले.**

राज्यभरातील अनेक मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीन बंद पडल्याच्या देखील घटना घडल्या. त्यामुळे ज्या ठिकाणी मतदानाला उशिरा सुरुवात झाली, त्या ठिकाणी मतदानाची वेळ वाढवून देण्यात आली आहे. दरम्यान, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मतदानाच्या प्रक्रियेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मतदारांच्या बोटावर लावली जाणारी शाई (इन्क) सहजासहजी पुसली जात असल्याचा दावा राज ठाकरेंनी केला आहे. शाई जर पुसली जात असेल, तर पारदर्शक मतदानावर प्रश्नचिन्ह उभे राहते असे म्हणत त्यांनी यावर आक्षेप घेतला. ▶▶ पान २ वर

### शाई पुसली जात नाही–निवडणूक आयुक्त

राज्यात मुंबईसह २९ महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना, मतदारांच्या बोटाला लावण्यात येणारी शाई पुसली जात असल्याच्या तक्रारींवर राज्य निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिले आहे. ''निवडणूक आयोगाची शाई एकदा सुकली की ती कोणत्याही प्रकारे निघत नाही, शाईबाबत केवळ संभ्रम निर्माण केला जात आहे,' असे स्पष्ट मत राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी व्यक्त केले.

## भाजपकडून महाराष्ट्रात कपटपूर्ण राजकारण; काँग्रेस

मुंबई । प्रतिनिधी

**भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कपटपूर्ण राजकारण करत आहेत, ज्यामुळे राज्याचे रूपांतर दुसऱ्या बिहारमध्ये होऊ शकते, असे महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. दरम्यान भाजपने सपकाळ यांचे आरोप फेटाळून लावत, त्यांना राज्यातील काँग्रेसमधील गटबाजी हाताळण्याचा सल्ला दिला आहे.**

एका पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ म्हणाले, भाजपने आणि फडणवीस यांनी महाराष्ट्राचे राजकीय वातावरण दूषित केले आहे. भाजपने महाराष्ट्रात एक विषारी तण वाढवले आहे. जागरूक नागरिकांनी ते ओळखले पाहिजे आणि आगामी नगरपालिका निवडणुकांमध्ये ते उपटून टाकले पाहिजे. या कपटपूर्ण राजकारणामुळे महाराष्ट्राचे ▶▶ पान २ वर

# मतदार यादीतून वगळलेली नावे सार्वजनिक करा!

## सर्वोच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

केरळमधील विशेष सघन पुनरीक्षण प्रक्रियेनंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीतून ज्यांची नावे वगळण्यात आली आहेत, त्यांची नावे सार्वजनिक करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी निवडणूक आयोगाला दिले.

मतदारांना आपली नावे का वगळली गेली, यावर आक्षेप



नोंदवता यावा आणि लोकशाहीतील त्यांचा मतदानाचा हक्क अबाधित राहावा, यासाठी न्यायालयाने हे पाऊल उचलले आहे. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणाची दखल घेत, वगळण्यात आलेल्या नावांवर आक्षेप नोंदवण्यासाठी असलेली मुदत किमान दोन आठवड्यांनी वाढवण्याचा विचार करावा, अशी सूचनाही आयोगाला केली आहे. केरळमधील एसआयआर प्रक्रियेला ▶▶ पान २ वर

# पुण्यात पकडलेले बोगस मतदार बीडचे

पुणे । प्रतिनिधी

**पुणे महानगरपालिका प्रभाग ४१ मध्ये बीड जिल्ह्यातून आलेल्या काही बोगस मतदारांना तेथील शिवसेना उमेदवार नाना भनगिरे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी पकडले विशेषता तीन ट्रॅव्हल्स देखील पोलिसांनी नजर कैदेत ठेवले असून सहा जणांना ताब्यात घेतले आहे यातील बहुतांशी मतदार हे गेवराई तालुक्यातील असल्याचे समजते.**

पुणे महानगरपालिकेसाठी मतदान सुरू होते सकाळी पुणे महापालिकेतील प्रभाग ४१ महादेव वाडी परिसरामध्ये बीड जिल्ह्यातून काही आलेले व्यक्ती मतदान करताना पकडले गेले कारसह हे ताब्यात घेण्यात आले असून प्रथम दर्शनी पोलिसांनी यांना नजर कैदेत ठेवलेले आहेत विशेषतः काही ट्रॅव्हल्स देखील पोलिसांनी तपासले आहेत त्याही पोलिसांनी नजर कैदेत ठेवलेले असून पुणे प्रभाग ४१ मधून शिवसेनेच्या वतीने निवडणूक लढवत असणारे नाना ▶▶ पान २ वर




## मतदान अधिकाऱ्याच्या मोबाईलमध्ये भाजपचे ॲप-आदित्य ठाकरे

मुंबई । प्रतिनिधी

निवडणूक आयोगाने १,८०,००० मतदार कापल्याचे आमच्या डेटामध्ये आले आहे. मतदानाच्या नावाखाली अशा प्रकारे नागरिकांना वेठीस धरले जात आहे. त्यांचा संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकारच हिरावून घेतला जात असेल तर मग घटनात्मक संस्था कशी?, असा सवालही करत मुंबईत काही ठिकाणी निवडणूक अधिकारी ▶▶ पान २ वर

# विनोद मुळूक बीड पालिकेचे उपाध्यक्ष

## दोन्ही क्षीरसागर यांना प्रत्येकी एक तर पंडितांचे तीन स्वीकृत सदस्य



बीड । प्रतिनिधी

बीड नगर परिषदेच्या उपाध्यक्ष पदासाठी गुरूवारी झालेल्या निवडीमध्ये भाजपाच्या डॉक्टर सारिका क्षीरसागर यांनी आपला अर्ज मागे घेतल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विनोद मुळूक यांची उपाध्यक्षपदी अविरोध निवड जाहीर करण्यात आली तर स्वीकृत सदस्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे तीन तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि भाजपाचा प्रत्येकी एक सदस्य निवडण्यात आला. या निवडी विरोधात भाजपाच्या गटनेत्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

बीड नगरपालिका निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदाचे ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### मतदान कार्डच्या गठ्ठ्यासह बोगस मतदार पकडला

अहिल्यानगर : अहिल्यानगर महापालिका निवडणुकीत बोगस मतदारांना पकडण्यात आले आहे. केडगाव आणि सावेडी उपनगरात हा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे, बोगस मतदारांना पकडून उमेदवारांनी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. या बोगस मतदारांकडे मोठ्याप्रमाणात बोगस मतदान कार्डचा गठ्ठा सापडला आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. या बोगस मतदारांमागील सूत्रधार कोण याचा शोध घ्या? तसेच बोगस मतदान करायचे असेल, तर मतदान प्रक्रिया बंद करा, अशी घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. त्यामुळे काही काळ मतदान प्रक्रियेत गोंधळ उडाला. अहिल्यानगर शहरातील सावेडी उपनगरात प्रभाग क्रमांक तीनमधील आनंद विद्यालयात मतदान केंद्रावर निवडणूक कार्डासह दोन बोगस मतदारांना पकडण्यात आले. यामुळे एकच खळबळ उडाली. या दोघांची झडती घेतली असता, त्यांच्या ताब्यातून वेगवेगळ्या नावांची शेकडो बनावट निवडणूक ओळखपत्रे आढळली. मतदान केंद्रावरील उमेदवारांनी यावर आक्षेप घेतला.

### स्वेच्छामृत्यू प्रकरणाचा निकाल ठेवला राखीव

नवी दिल्लीः गेल्या १३ वर्षांपासून व्हेजिटेटिव्ह स्टेटमध्ये (ब्रेन डेड अवस्थेत) असलेल्या ३२ वर्षीय हरीश राणाची जीवनरक्षक प्रणाली काढून घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालय विचार करत आहे. हरीशच्या पालकांनी दाखल केलेल्या पॅसिव्ह यूथनेशिया (निष्क्रिय स्वेच्छामृत्यू) याचिकेवरील सुनावणी पूर्ण झाली असून, न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. न्यायालयाने स्थापन केलेल्या दोन वैद्यकीय मंडळांनी या रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची कोणतीही शक्यता नसल्याचा अहवाल दिला आहे. न्या. जे.बी. परडीवाला आणि न्या. के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर पित्याने दाखल केलेल्या अर्जावर सुनावणी झाली.

### निर्यातक्षम राज्यांत महाराष्ट्र आघाडीवर

नवी दिल्लीः नीती आयोगाच्या निर्यात सज्जता निर्देशांक–२०२४ मध्ये (ईपीआय) महाराष्ट्राने तामिळनाडूला मागे टाकत पहिले स्थान पटकावले आहे. देशातील पाच राज्यांत गुजरात, उत्तर प्रदेश आणि आंध्र प्रदेशचा अनुक्रमे तीन, चार आणि पाचवा क्रमांक लागतो. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या यादीनुसार, महाराष्ट्राने तामिळनाडूकडून पहिले स्थान संपादन केले आहे. आर्थिक वर्ष २०२२ ते २०२४ या कालावधीत केलेल्या कामगिरीवरून ही यादी तयार करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०२२ मध्ये तामिळनाडूचा पहिला क्रमांक होता. खालोखाल महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात आणि हरियाणाचा क्रमांक लागत होता.

### केंद्रीय कर्मचाऱ्यांना २ कोटींचे विमा कवच

दिल्लीः ८ व्या वेतन आयोगाच्या प्रतीक्षेत असलेल्या केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी केंद्र सरकारने मोठी घोषणा केली आहे. वित्त मंत्रालयाने कर्मचाऱ्यांसाठी 'कम्पोजिट सॅलरी अकाउंट पॅकेज' लाँच केले असून, याद्वारे बँकिंग आणि विम्याच्या एकात्मिक सुविधा मिळणार आहेत. या विशेष खात्यांतर्गत कर्मचाऱ्यांना २ कोटी रुपयांचा एअर ॲक्सीडेंट कव्हर आणि १.५ कोटी रुपयांचा वैयक्तिक अपघात विमा मिळणार आहे. तसेच, हे खाते 'झिरो बॅलन्स' असून गृह, वाहन आणि शैक्षणिक कर्जावर व्याजात सवलत व प्रोसेसिंग फीमध्ये सूट दिली जाईल. याशिवाय मोफत लॉकर सुविधा, अमर्याद व्यवहार आणि एअरपोर्ट लाउंज एक्सेस असे फायदेही मिळतील. गट अ, ब आणि क मधील सर्व कर्मचारी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांद्वारे आपले खाते या पॅकेजमध्ये अपग्रेड करू शकतात.

### मुख्यमंत्री फडणवीस दावोसला रवाना

मुंबई : 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गुंतवणूक परिषदेसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह स्वित्झर्लंडमधील दावोस येथे जाणार आहेत. हा आठ दिवसांचा दौरा आहे. या परिषदेमध्ये महाराष्ट्रात जास्तीत जास्त परकीय गुंतवणूक आणण्याच्या हेतूने आणि औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण असणार आहे. दावोस येथे १७ ते २४ जानेवारीदरम्यान जागतिक आर्थिक परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेसाठी जगभरातील विविध देशांमधील, राज्यांतील प्रतिनिधींबरोबरच मोठमोठ्या नामांकित कंपन्यांही सहभागी होणार आहेत. दौऱ्यात फडणवीस यांचे भरगच्च कार्यक्रम असणार आहेत. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू, विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे आदी या दौऱ्यात सहभागी होणार आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१५ जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १७.०० क्विंटल | २,३५१ | २,८०२ | २,५४२ |
| ज्वारी/हायब्रिड : ७०.५० क्विंटल | १,७०० | ३,८०१ | ३,१५४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर :२४९.०० क्विंटल | ३,९४१ | ७,३०१ | ६,८४४ |
| उडीद :७.५० क्विंटल | ४,४०० | ६,००० | ५,२०० |
| बाजरी: ३०.५० क्विंटल | २,७०१ | ६,१२१ | ३,२७५ |
| मुग: १३.५० क्विंटल | ६,४१० | ७,७०२ | ६,९८७ |
| सोयाबीन: २७.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| हरभरा: ८.५० क्विंटल | ४,९४० | ५,००० | ४,९६३ |

cmyk

अग्रलेख

# प्रतिष्ठेसोबत अस्तित्वाचाही प्रश्न !

महाराष्ट्रातील २९ महापालिकांसाठी गुरूवारी निवडणूक पार पडली. देशातील सर्वात श्रीमंत महापालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई महापालिकेसाठीही मतदान झाले. मुंबई पालिकेवर आपला झेंडा फडकावा, यासाठी राज्यातील सत्ताधारी भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेचा प्रयत्न आहे तर दुसऱ्या बाजूने अनेक वर्षे आपली सत्ता गाजविणाऱ्या 'उबाठा' या उद्धव शिवसेनेने, आपल्या भावाशी 'मनसे'चे राज ठाकरे यांच्याशी युती करून भाजपला नामोहरम करण्यासाठी बराच प्रयत्न केलेला आहे. सुमारे सहा वर्षानंतर ही निवडणूक होत आहे आणि या निवडणुका वारंवार पुढे ढकलण्याचा प्रयत्न होत राहिला. अखेरीस या निवडणुका घेणे न्यायालयाने सरकारला भाग पाडले. मुंबई महापालिका निवडणूक ही सर्वात जास्त गाजली. गेला महिनाभर या महापालिकेसाठी निवडणुकीचा प्रचार विविध राजकीय पक्षांनी जोरात सुरू केलेला आहे परंतु सर्वात मोठी लढत ही भाजप-शिवसेना विरोधात 'उबाठा' अशीच आहे.

ही निवडणूक यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे की, कोण, कोणत्या पक्षाबरोबर आहे, याबाबत जनतेमध्ये फार संभ्रम निर्माण झाले. कारण युती सरकारमधील भाजप-शिवसेना हे एकत्र असले तरी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हे सत्तेत सामील असून देखील सरकारच्या विरोधात गेलेले आहे. त्यामुळे ही निवडणूक फार लक्षवेधी ठरत आहे. अजित पवार हे या सरकारमधील उपमुख्यमंत्री आहेत. असे असतानाही त्यांनी युतीचा धर्म पाळला नाही. त्यामुळे महापालिका निवडणुका व त्यांचा निकाल झाल्यानंतर युतीमध्ये बराच मोठा स्फोट होईल, असे मत राजकीय भविष्यकारांनी व्यक्त केले आहे. वैयक्तिक हेवेदावे, त्याचबरोबर एकमेकांच्या भानगडी चर्चेत आणणे, नेहमीप्रमाणे उद्धव आणि राज ठाकरे यांची भन्नाट निवेदने, त्यामुळे उद्विग्न झालेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेला पलटवार आणि नेहमीप्रमाणे काय वाटेल ती निवेदने करण्यास प्रसिद्ध असलेल्या खासदार संजय राऊत यांनी केलेली निवेदने, हे सर्व पाहिल्यानंतर या निवडणुका अटीतटीच्या तर होतीलच शिवाय त्या फार निर्णायक ठरणार आहेत. सर्वाधिक जोर हा मुंबई महापालिका निवडणुकीवर आहे. देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या महापालिकेचा कारभार व त्याची व्याप्ती ही एका मध्यम आकाराच्या राज्यासारखीच आहे. त्यामुळे या महापालिकेवर सत्ता येण्यासाठी शिवसेना-भाजपा आणि 'उबाठा' प्रयत्न करणार परंतु निवडणुकीच्या निमित्ताने एकमेकांचे उणेदुणे काढताना राजकीय नेत्यांनी नैतिकतादेखील पाळली नाही, हे सत्य आहे. मराठी माणूस वाचविण्यास आपणच सिद्ध आहोत, असा दावा 'उबाठा' नेते उद्धव ठाकरे आणि त्यांचे बंधू राज ठाकरे यांनी केलेला आहे. त्यांनी ही निवडणूक म्हणजे मराठी माणसांच्या अस्मितेची आहे आणि मराठी माणसांच्या अस्तित्वासाठीची निवडणूक आहे, असे जाहीर केले. दुसऱ्या बाजूने भाजप-शिवसेनेने म्हटले आहे की, ही निवडणूक मराठी माणसांच्या अस्तित्त्वाची नसून ही लढाई ठाकरे बंधूंच्या अस्तित्वासाठीची आहे. आज महाराष्ट्रामध्ये, विशेषत: मुंबईमध्ये मराठी माणसे मागे का पडतात आणि परराज्यातील माणसे तिथे स्थायिक होतात आणि अनेक धंदे-व्यवसाय त्यांनी आपल्या ताब्यात घेतलेले आहेत. हा विषय कसा संवेदनशील आहे. त्याला अनेक कंगोरेदेखील आहेत परंतु निवडणुकीच्यादरम्यान मराठी माणूस आणि परराज्यातून आलेली मंडळी, असा जो मतभेद करण्यात आला तोच एक महत्त्वाचा मुद्दा धरून उद्धव-राज यांनी या निवडणुकीच्या तोफा डागल्या, त्या भारतीय जनता पक्षावरच. या निवडणुकीत मतदान करणारे केवळ मराठी माणूसच नाहीत तर महाराष्ट्रात आतापर्यंत स्थायिक झालेली परराज्यातील देखील मंडळी मोठ्या प्रमाणात आहेत. ही निवडणूक काही राज्य विधानसभेची निवडणूक नाही. ही केवळ महापालिकांची निवडणूक आहे. तरीदेखील या निवडणुकीत राज्य पातळीवरचे विषय हाताळण्यात आले. मराठी माणूस विरोधात पर राज्यातील माणूस आणि खास करून गुजराती माणसांना टार्गेट करून 'उबाठा' व 'मनसे' या दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी विविध ठिकाणी सभा घेतल्या आणि त्यांच्या सभांना मिळालेला उदंड प्रतिसाद हा प्रत्यक्षात मतदानामध्ये किती रुपांतरित होतो, हा विषय अलग. परंतु निवडणुका मात्र गाजलेल्या आहेत, निश्चित.

महाराष्ट्रातील महापालिकांच्या निवडणुकींना जर एवढा मोठा दर्जा मिळत असेल तर निश्चितच मानावे लागेल कारण या निवडणुका फार अटीतटीच्या आहेत आणि राजकीय पक्षांसाठी त्या अत्यंत प्रतिष्ठेच्या आहेत. यापूर्वीच्या मुंबई महापालिकेची निवडणूक भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना या युतीने जिंकलेली होती मात्र दोन्ही पक्ष वेगवेगळे झाले आणि त्यात शिवसेनेची सत्ता कायम राहिली.

आता राज्यात भाजपने शिंदेच्या शिवसेनेबरोबर आघाडी केलेली आहे. प्रथमच या निवडणुकीत 'हिंदुत्व' हा विषयदेखील प्रामुख्याने खुलेआम जाहीर भाषणातून उघड करण्यात आलेला आहे. अनेक नेत्यांची जीभ या निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे घसरलीच. महापालिका क्षेत्रातील मतदार सर्वांच्याच कारभारावर लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे आजच्या निकालात महाराष्ट्रातील सूज्ञ शहरी मतदार नेमकी कोणती भूमिका बजावतो, हे पाहण्याची गरज आहे. या निवडणुकीचा राज्य सरकारवर फारसा परिणाम होणार नाही कारण सरकारकडे बहुमत आहे परंतु या निवडणुकीनंतर राज्यातील राजकीय समीकरणे थोडी-फार निश्चितच बदलली जातील, यात शंका नाही. निवडणुका महापालिकेच्या परंतु काही राजकीय पक्षांसाठी त्या अस्तित्वाच्या आहेत तर काही राजकीय पक्षांसाठी अत्यंत प्रतिष्ठेच्या देखील आहेत. सूज्ञ मतदारांच्या हातात बरेच काही आहे. त्यामुळेच मतदार सद्सद्विवेकबुद्धीने मतदान करतील, अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही.

## भगवान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यास विद्यापीठाचे सुवर्णपदक

**आष्टी । प्रतिनिधी**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या परीक्षा विभागाने एप्रिल/ मे २०२५ मध्ये घेतलेल्या परीक्षांमध्ये येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या भगवान महाविद्यालयाचा सुजित अशोक उबाळे हा विद्यार्थी एम. ए. इंग्रजी या विषयामध्ये विद्यापीठात सर्वाधिक (७७.६%) गुण प्राप्त करून सुवर्णपदकाचा मानकरी ठरला.**



बुधवार दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या ३२ व्या नामविस्तार दिनी कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या विशेष पारितोषिक वितरण कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रत्येक विषयामध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यास सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. बी. एन. डोळे यांनी विविध विषयांतील सुवर्ण पदक विजेत्या विद्यार्थ्यांच्या नावांची घोषणा केली. यामध्ये भगवान महाविद्यालयाचा विद्यार्थी सुजित उबाळे याने एम. ए. इंग्रजी या विषयाचे प्रा. एस. टी. प्रधान सुवर्णपदक कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते स्वीकारले. विद्यापीठाच्या नाट्यगृहामध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमामध्ये मंचावर प्रमुख पाहुणे ज्येष्ठ कवी प्रा. फ.मु. शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. वाल्मीक सरोदे, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. भारत खंदारे, डॉ. अपर्णा पाटील व विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. कैलास अंभुरे उपस्थित होते. 'ग्रामीण भागातील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याने मिळवलेले हे यश म्हणजे महाविद्यालयाच्या शिरपेच्यात खोवलेला मानाचा तुरा आहे' असे गौरवोद्गार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी काढले.सुजितच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष भीमराव धोंडे, सहसचिव व विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अजयदादा धोंडे, महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व कर्मचाऱ्यांनी सुजित उबाळे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रो. शिवाजी पवार व प्रा. निरंजन हेळकर यांचे अभिनंदन केले आहे.या यशाबद्दल महाविद्यालयाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## मतदानासाठी निघालेल्या मतदारांवर पिसाळलेल्या कुत्र्याचा हल्ला; १५ जण जखमी

### महानगरपालिकेने कुत्रा पकडला

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरात गुरुवारी सुरू असलेल्या महानगरपालिका मतदानाच्या दिवशी एक धक्कादायक घटना घडली. मतदानासाठी घराबाहेर पडलेल्या मतदारांवर एका पिसाळलेल्या कुत्र्याने अचानक हल्ला चढवला. या घटनेत १० ते १५ नागरिक जखमी झाले असून, सर्व जखमींवर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेसंदर्भात महानगरपालिकाचे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांना विचारले असता ते म्हणाले की घटनेची माहिती समजतात तत्काळ पिसाळलेला कुत्र पकडण्यात आले तसेच सदरील कुत्र्याला रेबीजचे लक्षण असल्याचे दिसून आले अशी माहिती श्री अर्जुन गिराम यांनी दिली.**



ही घटना दुपारी सुमारे ३ वाजताच्या सुमारास घडली. शहरातील सरस्वती भुवन परिसर, शनी मंदिर परिसर तसेच काली मशीद परिसरात मतदानासाठी बाहेर पडलेल्या मतदारांवर व स्थानिक नागरिकांवर या पिसाळलेल्या कुत्र्याने अचानक हल्ला केला. काही क्षणांतच मतदान केंद्रा परिसरात एकच गोंधळ उडाला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, या कुत्र्याने एका मागोमाग एक नागरिकांवर हल्ला करत अनेकांना चावा घेतला. काही जखमींच्या पायाला गंभीर जखमा झाल्या असून, एका व्यक्तीच्या हाताची करंगळी कुत्र्याच्या चाव्यामुळे गंभीररीत्या जखमी झाली आहे. विशेष म्हणजे, या घटनेत एका लहान मुलालाही कुत्र्याने चावा घेतल्याची माहिती समोर आली घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखत जखमींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात उपचारासाठी मोठी गर्दी झाली होती. सध्या सर्व जखमींवर आवश्यक वैद्यकीय उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. खबरदारीचा उपाय म्हणून जखमींना रेबीज प्रतिबंधक लसीकरण देण्यात येत आहे. या घटनेमुळे संबंधित परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून मतदानासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते दरम्यान, महापालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन संबंधित पिसाळलेल्या कुत्र्याचा बंदोबस्त करावा, तसेच शहरातील भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. सदरील सदरील कुत्रे पकडणे एजन्सी चे काम मंद गतीने सुरू असल्याचे यावरून दिसून येत आहे. मतदानासारख्या महत्त्वाच्या लोकशाही प्रक्रियेच्या दिवशी नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाने याबाबत तात्काळ ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मोगरा जि.प.शाळेत माता-पालक संघाच्या वतीने हाळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील जि.प.प्रा.शाळा मोगरा शाळेत माता-पालक संघाच्या वतीने हळदी-कुंकू समारंभाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.या उपक्रमातून शाळा व पालक यांच्यातील सहकार्यात्मक भागीदारी अधिक सुदृढ करण्याचा धोरणात्मक उद्देश प्रभावीपणे साध्य झाला.**



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लताबाई नवनाथ इंगळे उपस्थित होत्या.प्रमुख पाहुण्या म्हणून प्रयागाबाई संपत्ती शिंदे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला सामाजिक व सांस्कृतिक मूल्यवृद्धीचा मजबूत पाया दिला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे माता-पालक संघाच्या कार्यपद्धतीला दिशादर्शक व प्रेरणादायी दृष्टिकोन प्राप्त झाला.या कार्यक्रमा अंतर्गत महिलांसाठी संगीत खुर्ची व उखाणे घेण्याचा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला.या सहभागात्मक उपक्रमांमुळे महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला व कार्यक्रमाची संलग्नता, आनंददायी वातावरण आणि सहभागाची तीव्रता अधिक वाढली.एकूणच, हा उपक्रम शाळेच्या समावेशक सहभाग, समुदाय संलग्नता आणि सकारात्मक शैक्षणिक परिसंस्था निर्माण करण्याच्या दीर्घकालीन उद्दिष्टांच्या दृष्टीने एक परिणामकारक व मूल्यवर्धक पाऊल ठरला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जि.प.प्रा.शाळा मोगरा येथील मुख्याध्यापक सुभाष घनघाव, सहशिक्षक हानुमंत पांढपोटे, सहशिक्षक सोनवले सर, सहशिक्षक बालाप्रसाद चव्हाण, सहशिक्षीका गायके मॅडम अबुज मॅडम यांनी प्रयत्न केले.

## धारूर नगर परिषदेला निवड झालेल्या दोन्ही स्वीकृत डॉक्टर नगरसेवकांचा डॉक्टर असोसिएशनच्या वतीने सत्कार

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**धारूर नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्य पदी दोन्ही जागांवर वैद्यकीय क्षेत्रातील असणारे माजी नगराध्यक्ष डॉ.स्वरूपसिंह हजारी व डॉ मयूर सावंत यांची निवड झाल्याने त्यांचा सत्कार डॉक्टर असोसिएशनच्या वतीने करून त्यांच्या निवडीचे स्वागत करण्यात आले व त्यांना पुढील कार्यास ही शुभेच्छा देण्यात आल्या .**

धारूर नगर परिषदेमध्ये स्वीकृत सदस्यांच्या दोन जागा होत्या यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून एक तर भाजपकडून एक सदस्य निवडला जाणार होता यामध्ये भाजपाकडून माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी यांची तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष डॉ मयूर सावंत यांची निवड झाल्याने या दोनही वैद्यकीय व्यावसायिकांचा तालुका डॉक्टर असोसिएशनच्या वतीने सत्कार करून त्यांचे कौतुक करण्यात आले व त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा ही देण्यात आल्या यावेळी डॉ.राम शिनगारे, डॉ. पी एस मुंडे, डॉ.आत्माराम मुंडे, डॉ.भागवत शिनगारे, डॉ.गोकुळ शिनगारे, डॉ.नवनाथ चव्हाण, डॉ.भगवान तोंडे, डॉ.अमित शेटे,डॉ. सचिन मंत्री,डॉ. सोमनाथ व्यवहारे, डॉ.सुंदर जायभाये, डॉ. भारत मुंडे डॉ. शंकर मोरे, डॉ. कृष्णा शेळके, डॉ अरविंद निकते, डॉ.निलेश उमापडॉ.अमोल दुबे यांची उपस्थीती होती.

## डॉ.विकास परदेशी यांचा पीएचडी पदवी मिळवल्याबद्दल केंद्राच्या वतीने सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कारेगव्हाण तालुका जिल्हा बीड या ठिकाणी कार्यरत असणारे श्री विकास मच्छिंद्र परदेशी प्राथमिक पदवीधर शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू अनुभवी तळमळीचे व्यक्तिमत्व जि प प्रा शा कारेगव्हाण शाळेचे शिल्पकार तसेच विठ्ठल पेठ नेकनूर केंद्राचे प्रभारी लोकप्रिय केंद्रप्रमुख यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर अंतर्गत हिंदी विषयात इक्कीसवी सदी की दलित कहानियों में नारी चित्रण या विषयावर डॉ. सुरेश मुंडे प्रोफेसर संत सावतामाळी महाविद्यालय फुलंब्री यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करून आपला प्रबंध डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी दाखल केला दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी मौखिक चाचणी संपन्न होऊन विद्यापीठाने विकास मच्छिंद्र परदेशी यांना पीएचडी ही पदवी नुकतीच प्रदान केली आहे या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांमधून अभिनंदन होत आहे जिल्हा परिषद शाळेमध्ये कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना प्रेरणादायी काम सरांनी केले आहे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे व या उच्च शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी केला पाहिजे यासाठी सर सतत प्रयत्न करत असतात अप्रशिक्षित शिक्षण सेवक म्हणून सेवेला सुरुवात केल्यानंतर सेवा अंतर्गत सर्व पदव्या मिळवून सरांनी पीएचडी पूर्ण केली आहे याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे विठ्ठल पेठ नेकनूर केंद्रातील घटक शाळेच्या मुख्याध्यापक यांची मासिक बैठक प्रशा वडगाव येथे आयोजित केली होती यावेळी केंद्रप्रमुख . डॉ विकास मच्छिंद्र परदेशी यांचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडेवस्ती चे मुख्याध्यापक श्री संतोष गायकवाड यांनी सत्कार केला . यावेळी सर्व घटक शाळेचे मुख्याध्यापक सत्कारायला उपस्थित होते .



## पान १ वरून...

### १५,९०८ उमेदवारांचे राजकीय

राज ठाकरेंच्या दाव्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने तात्काळ भूमिका स्पष्ट केली आहे. मतदानासाठी वापरली जाणारी शाई ही गुणवत्तापूर्ण असून ती सहजासहजी निघणारी नाही. नागरिकांनी शाईबाबत कोणताही संभ्रम मनात ठेवू नये किंवा अफवा पसरवू नयेत असे आवाहन निवडणूक आयोगाने केले आहे.

------------

### ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग?

विविध संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणाचे एक्झिट पोलचे आकडे समोर आले आहेत. एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली आहे. यात ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग तर भाजप-शिंदे युतीला बहुमताचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. एक्सिस माय इंडियाच्या अंदाजानुसार, मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपप्रणित महायुतीला १३१ ते १५१ जागा मिळण्याचा अंदाज आहे. याचाच अर्थ भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मुंबईत बहुमत मिळणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दुसरीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि मनसे पक्षांच्या युतीला ५८ ते ६८ जागांवर समाधान मानावं लागू शकतं, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. याचाच अर्थ उद्धव ठाकरेंच्या मुंबई महापालिकेतील सत्तेला इथे सुरुंग लागण्याची शक्यता आहे. दोन्ही ठाकरे बंधूंसाठी हा मोठा धक्का आहे. एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलनुसार, मुंबईत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीला १२ ते १६ जागांवर यश मिळणार असल्याचा अंदाज आहे. तर, मुंबईत अपक्ष आणि इतरांचे ६ ते १२ जागा जिंकून येण्याची शक्यता आहे. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, मुंबईत भाजपच्या महायुतीला ४२ टक्के मतं मिळणार असल्याचा अंदाज आहे. तर ठाकरेंच्या युतीला ३२ टक्के मते मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर काँग्रेसला १३ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे.

----------

### मतदार यादीतून वगळलेली

आव्हान देणाऱ्या विविध याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. याचिकाकर्त्यांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, नवीन प्रारूप यादीतून तब्बल २४ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. मात्र, नेमकी कोणाची नावे वगळली गेली आहेत, याची कोणतीही स्पष्ट यादी उपलब्ध नसल्यामुळे नागरिक आपले आक्षेप नोंदवू शकत नाहीत. तांत्रिक चुकांमुळे जिवंत व्यक्तींना मृत घोषित करणे किंवा राज्याबाहेर राहत असल्याचे दाखवून नावे कमी करणे, असे गंभीर प्रकार घडल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. या प्रकरणातील पारदर्शकतेचा अभाव ग्रामीण भागातील मतदारांसाठी मोठी अडचण ठरत असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. यावर तोडगा म्हणून, वगळलेल्या मतदारांच्या याद्या ग्रामपंचायत कार्यालये किंवा गावांमधील महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणांवर प्रदर्शित कराव्यात, असे आदेश खंडपीठाने दिले आहेत. तसेच, नागरिकांना घरबसल्या ही माहिती मिळावी यासाठी या याद्या निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावरही तातडीने अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

-----------

### भाजपकडून महाराष्ट्रात

रूपांतर दुसऱ्या बिहारमध्ये होईल. त्यांनी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांच्या उमेदवारांवरील हिंसाचाराचाही उल्लेख केला आणि आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ काही घटनांचा दाखला दिला. सोलापूरमध्ये एका उमेदवाराची हत्या झाली, तर अकोट आणि खालापूरमध्येही हत्या झाल्या आहेत. राज्यभरातील अनेक उमेदवारांना धमक्या मिळाल्या आहेत. त्यांच्या कुटुंबीयांना घाबरवण्यात आले आहे. लक्ष्य केलेले सर्वजण विरोधी पक्षांचे आहेत, जे गुंड आणि सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्ट युतीला आव्हान देत असल्याचे सपकाळ म्हणाले. त्यांनी मतदारांना कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडता घटनात्मक लोकशाहीचे संरक्षण करण्याचे आवाहन केले. सपकाळ यांना उत्तर देताना, भाजपचे प्रदेश प्रवक्ते अजित चव्हाण म्हणाले की, सपकाळ यांचा त्यांच्याच पक्षात आदर नाही. सपकाळ यांनी आधी आपले घर सांभाळावे. राज्य काँग्रेसमधील अनेक गट त्यांचा आदर करत नाहीत आणि त्यांचे ऐकतही नाहीत. ते हायकमांडने नियुक्त केलेले नेते आहेत, फडणवीस यांच्यासारखे लोकांचे नेते नसल्याचे त्यांनी म्हटले.

-----------

### मतदान अधिकाऱ्याच्या मोबाईलमध्ये

देखील भाजपचा प्रचार करत आहेत. आमचे उमेदवार सचिन पाटील यांनी अशा अधिकाऱ्यांना पकडले देखील आहे. मतदान अधिकारी यांच्या फोनवर भाजपचे मेसेजेस मदत करत होते, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी गुरूवारी माध्यमांशी बोलताना केला. मुंबईमध्ये गणेश नाईकांना मतदान करण्यासाठी एक तास फिरावे लागले. निवडणूक आयोगाचा हा चुकीचा कारभार समोर आला. वर्षानुवर्षे गणेश नाईक जिथे मतदान करतात ते न करता थेट वाशीला जावे लागले. त्यांच्यामध्ये मी दोन-चार रील्स पाहिल्या होत्या; त्यांचे मन व्यक्त करत असताना आणि मला खात्री आहे की त्यांच्या मनात आहे ते करून दाखवतील. अनेक असे मतदार आहेत ज्यांना मतदानाची रिसीट मिळाली, मात्र मतदान यादीमध्ये तिथे पोहोचल्यानंतर नाव नाही. अनेकांची नावे जी आहेत ती स्कॅन केल्यानंतर पंधरा-पंधरा नावे दिसून येतात, असे देखील दिसले. काही ठिकाणी पुरुषाचे नाव आणि महिलेचा चेहरा असल्याचे दिसून आले, असे दावे करीत आदित्य ठाकरे यांनी सरकार आणि निवणूक आयोगावर निशाणा साधला.

---------

### विनोद मुळूक बीड पालिकेचे

उमेदवार राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे असले तरी उपाध्यक्ष पदासाठी पुरेसे बहुमत नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची मदत घेण्यात आली मात्र त्यापूर्वीच भाजपाच्या उपाध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉक्टर सारिका क्षीरसागर यांनी आपला अर्ज मागे घेतल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे उमेदवार विनोद मुळूक यांना बिनविरोध विजय घोषित करण्यात आले. त्यानंतर झालेल्या स्वीकृत सदस्यांच्या निवडीवेळी मात्र मोठा गोंधळ उडाला. नियमाने राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट दोन, भाजपा दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट एक असे सदस्य नियुक्त होणे संख्याबळानुसार नियमात असताना, पिठासीन अधिकारी नगराध्यक्ष प्रेमलता पारवे यांनी मात्र त्यांच्या पक्षाच्या अतिरिक्त असलेल्या उमेदवाराला घोषित केले. त्यामुळे भाजपच्या सारिका क्षीरसागर यांनी आपण याविरुद्ध न्याय मागणार असल्याचे सांगत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मोईन मास्टर, दिनेश मुंदडा आणि भीमराव वाघचौरे तर भापज गोविंद शिराळे, राष्ट्रवादी शरद पवार गट मकसूद खान यांची स्विकृत नगरसेवर म्हणून निवड करण्यात आली आहे.

----------

### पुण्यात पकडलेले

भानगिरे व त्यांच्या कार्यकर्त्यांच्या ही बाब लक्षात आली त्यांनी या सर्वांची झाडाझडती घेतली असता यांच्याकडे प्रत्येकी तीन ते चार हजार रुपये व अन्य रकमा मिळून आल्या हे सर्वजण कारमधून आले होते याशिवाय हे सर्व पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे असल्याचा आरोप भानगिरे यांनी केला असून सदरील बोगस मतदार हे गेवराई तालुक्यातून असल्याची माहिती मिळत आहे मात्र ताब्यात घेण्यात आलेले बोगस मतदार हे बीड धाराशिव या जिल्ह्यातील असल्याचे भानगिरे यांनी सांगितले पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या या व्यक्तींची नावे मात्र उशिरापर्यंत समजू शकले नाहीत.

## थोडक्यात



आष्टी : तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अतुल शेठ मेहेर यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना अध्यक्ष कीशोर नाना हंबर्डे, प्राचार्य सोपानराव निंबोरे सर, सदस्य ईतर

## सरकारी कामगार अधिकारी यांना बांधकाम कामगारांच्या विविध मागण्या संदर्भात निवेदन




वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील बांधकाम कामगारांचे मे २०२५ पासुन नोंदणी अर्ज प्रलंबित आहेत तसेच प्रलंबित नूतनीकरण,व लाभाचे अर्ज ताबडतोब निकाली काढा, तसेच गेल्या ४ वर्षांपासून अटल घरकुल योजनेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत ते तातडीने निकाली काढण्यात यावे, आणि जिल्हात तपासणी ते आरोग्य उपचार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी,व बांधकाम कामगारांना आर.पी.एल , प्रशिक्षणाचे प्रामाणपत्र व ४२०० रू वाटप करण्यात यावे.जिल्हा स्तरावरील बांधकाम कामगारांनाच्या प्रोफाईल मधील दुरुस्ती करण्यासाठी आलेल्या अर्जाचा लवकर निपटारा करावा.शैक्षणिक अर्थ साहाय्य योजने अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावे यासर्व न्याय मागण्याच निवेदन देण्यात आले हे निवेदन व सरकारी कामगार अधिकारी श्री.कोणाळे साहेब यांनी स्वीकारले व निवेदनातील सर्व मागण्यावर सकारात्मक चर्चा झाली व सर्व प्रलंबित अर्ज येत्या आठवड्यात निकाली काढु असा शब्द कामगार अधिकारी यांनी दिला.व सर्व मागण्याची गांभीर्याने दखल घेऊन लागलीच आर.पि.एल, आरोग्य योजनेच्या कर्मचाऱ्यांची बैठक लावली .

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयामध्ये कोटक बँकेसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

म. शि. प्र.मंडळाच्या सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्लेसमेंट विभागामार्फत कोटक बँकेसाठी दि १७ जानेवारी रोजी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयाचे करियर गाइडन्स आणि प्लेसमेंट सेल आणि पुणे येथील ग्लोबल आऊटसोर्सिंग आणि ट्रेनिंग सर्विसेस यांच्या संयुक्त विद्यमाने खाजगी क्षेत्रातील नामवंत बँकेसाठी कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन करण्यात आले आहे.दि १७ जानेवारी २०२६ रोजी शनिवारी सकाळी १० वाजता महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये मुलाखती चे आयोजन करण्यात आलेले आहे.यामध्ये महाविद्यालयातून २०२२ पासून २०२६ पर्यंत कोणत्याही शाखेतून पदवी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी विद्यार्थिनी मुलाखतीसाठी सहभागी होऊ शकतात. कॅम्पस मुलाखतीच्या अधिक माहिती करिता प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. डॉ. मोतेकर एस.सी . प्रा. उदावंत बि.डी. गणेश शहाणे यांच्याशी संपर्क साधावा. खाजगी बँकिंग क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी मुलाखतीस उपस्थित राहून संधीचा जास्तीत जास्त लाभ करून घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. के .सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. एन .के. मुळे ,उपप्राचार्य डॉ.प्रा. कव्हळे एम. ए., प्रा.पी .व्ही. गवते, प्रा. पी. एस .शिंदे, प्रबंधक प्रशांत चव्हाण यांनी केले आहे.

## भाजपनेच मराठा समाजाला न्याय दिला, मात्र 'शिवछत्र'कडून अन्याय

### भाजपचे नेते काकासाहेब जोगदंड, अरुण बोंगाने यांचा गंभीर आरोप

बीड । प्रतिनिधी

भाजपने नेहमीच मराठा समाजाला न्याय देण्याची भूमिका घेतली आहे.





बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत स्वीकृत सदस्य पदाच्या नियुक्तीमध्ये मात्र 'शिवछत्र'कडून मराठा समाजावर अन्याय करण्यात आला आहे, असा आरोप भाजपचे नेते काकासाहेब जोगदंड, अरुण बोंगाने यांनी केला आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले की, भाजपने कायम मराठा समाजाच्या हिताची भूमिका घेतली आहे. बीड नगरपरिषद निवडणुकीत भाजपने स्वीकृत सदस्य पदासाठी गोविंद शिराळे आणि रवी कदम या मराठा तरुणांना संधी देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र प्रत्यक्ष नियुक्ती करताना भाजपच्या रवी कदम यांच्यासारख्या युवक नेतृत्वावर अन्याय करत इतरांना स्वीकृत सदस्य पदी स्थान देण्यात आले. ही निवड प्रक्रिया पूर्णतः अन्यायकारक असून हा अन्याय 'शिवछत्र'कडून करण्यात आला आहे. या प्रकारामुळे मराठा समाजामध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. भाजपने मराठा समाजाला नेहमीच न्याय दिला आहे, मात्र या प्रकरणात मराठा युवक नेतृत्वावर अन्याय झाल्याची भावना समाजात असून आगामी निवडणुकांमध्ये याचा फटका बसेल, असा इशारा भाजपचे नेते काकासाहेब जोगदंड, अरुण बोंगाने यांनी दिला आहे.

## अवैध गुटखा विक्री करणाऱ्या दोघांना गेवराई पोलिसांनी घेतले ताब्यात

### तंबाखू ,सुपारी, चुना, मावा बनवण्याच्या साहित्यासह बारा लाखाचा माल जप्त

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत त्यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील कारवाई सुरू असून दिनांक १५ जानेवारी रोजी गेवराई पोलिसांनी शानदार पान सेंटरवर छापा मारून समीर महबूब शेख व अमजद जाफर शेख या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून १२ लाखाचा मुद्देमाल जप्त केला.



गेवराई शहरामध्ये मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी पथक तयार करून सकाळी गेवराई शहरातील शानदार पान सेंटरवर छापा मारून समीर महबूब शेख रा.कोरबू गल्ली गेवराई, व अमजद जाफर शेख रा.कोरबू गल्ली गेवराई या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून मावा तयार करण्यासाठी लागणारे साहित्य ज्यामध्ये सुगंधित सुपारी, चुना, तंबाखू, इतर घटकांचे मिश्रण तयार करून मानवी शरीरासाठी अपायकारक असलेला मिक्सरद्वारे तयार केलेला मावा व तयार करण्याचे दोन मिक्सर तसेच मावा वाहतूक करण्यासाठी वापरली जाणारी स्विफ्ट कंपनीची कार व एक दुचाकी असे ११ लाख ९८ हजार आठशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक अभिजीत कटके, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार,सपोनि संतोष जंजाळ,पोउपनि राम खोत,पोह. हंबर्डे पोकॉ जितेंद्र ओव्हाळ, मपोका कोंता यांनी केली असून या प्रकरणात गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

## भ्रष्टाचाराची कीड काढायची असेल तर संस्थेत विद्यार्थी घडणे आवश्यक –अनिकेत आमटे

शिरूर । प्रतिनिधी

उपेक्षित आणि दुर्गम भागातील विकास कामासाठी एखाद्या प्रशासनातील अधिकाऱ्यांनी लक्ष घातले तर त्या भागाचा चेहरा मोहरा बदलू शकतो परंतु ही कामे दुर्दैवाने पारदर्शक होत नाहीत कारण आपल्या देशात भ्रष्टाचाराची मोठी कीड लागलेली आहे. भ्रष्टाचाराची कीड काढायचे असेल तर शांतीवन सारख्या संस्थेमध्ये विद्यार्थी घडायला हवेत , तेच अधिकारी भ्रष्टाचाराची कीड काढून विकास कामे साधू शकतात या विद्यार्थ्यांना बळ मिळणे गरजेचे असल्याचे मत सुप्रसिद्ध समाजसेवक अनिकेत प्रकाश आमटे यांनी व्यक्त केले आहे.




शिरूर कासार तालुक्यातील आर्वी येथील शांतीवन अनाथालयामध्ये सोमवार दि. १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून शांतीवनचे संस्थापक दीपक नागरगोजे यांच्या गुलामीच जिणं अंधारातलं जगणं या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद व हिरवं सपानं या पुस्तकाची तिसरी आवृत्ती या दोन्ही पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले आहे. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बालकल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे यांची उपस्थिती लाभली होती तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध समाजसेवक अनिकेत प्रकाश आमटे

डॉ.पृथ्वीराज बारगजे, आश्विन भोंडवे, प्रा.भास्कर बडे,जागृती बारगजे, समिर पठाण, आजिनाथ गवळी,माजी सरपंच शाहाजी भोसले,चेअरमन गोपाल भुसारे,अंकुश कांबळे,गोवर्धन दराडे गोकुळ पवार,सचिन खेडकर,सचिन गायकवाड,कावेरी नागरगोजे आदींची उपस्थिती लाभली होती. पुढे बोलताना अनिकेत आमटे म्हणाले, दीपक नागरगोजे यांची शांतीवनच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य चालू आहे. त्यांना उपेक्षित आणि दुर्गम भागातील जनतेच्या प्रश्नाबद्दल कळवळा आणि तळमळ आहे. म्हणूनच ते अट्टाहासाने हे कार्य करत आहेत. शांतीवन या संस्थेमध्ये घडलेल्या विद्यार्थ्यांनाही या कार्याची जाण राहील आणि घडलेली विद्यार्थी समाज करा कार्याचा वसा आणि वारसा घेतील समाजाला व प्रशासनाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड घालवायचे असेल तर शांतीवन सारख्या संस्थेमध्ये विद्यार्थी घडणे झाले असल्याचे मत यावेळी समाजसेवक अनिकेत प्रकाश आमटे यांनी व्यक्त केले आहे. यावेळी बीड जिल्ह्यातून सामाजिक कार्यामध्ये कार्य करणारे अनेक सेवाभावी व्यक्तींसह, परिसरातील ग्रामस्त, पत्रकार बांधव, विद्यार्थी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली होती.

## आत्मविश्वास, नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व घडवणारा प्रवास: गुरुकृपाचा दोन दिवसीय उत्कृष्ट उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, माजलगाव यांच्या वतीने राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निम्मित १२ व १३ जानेवारी रोजी विद्यार्थी, प्राध्यापक तसेच सर्व कर्मचाऱ्यांसाठी ''व्यक्तिमत्व विकास'' या विषयावर दोन दिवसीय अनोख्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे भव्य आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्ते डॉ. अनिलकुमार गर्ग यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लाभली त्याच बरोबर गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले, आयुर्वेदचे प्राचार्य डॉ. प्रज्वल मस्के, फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. मकेश बाबू, फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमित बिंदू , नर्सिंगच्या प्रा. पूनम खानापूरकर आदी मान्यवर उपस्थितीत होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रज्वल मस्के यांनी केले तद्नंतर डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना सदरील दोन दिवसीय शिबिराचा आस्वाद घेण्यासाठी संबोधित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. राहुल वांडरे यांनी केले. या उपक्रमाचे प्रमुख आकर्षण डॉ. अनिलकुमार गर्ग हे फिनको या कंपनीचे संस्थापक असून ते एक सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी व्याख्याते व सेल्स गुरु म्हणूनही प्रचलित आहेत. या कार्यक्रमात डॉ. गर्ग यांनी व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध पैलू उलगडून सांगितले. आत्मविश्वास वाढवणे, प्रभावी संवादकौशल्य, नेतृत्वगुण, तणाव नियंत्रण, सकारात्मक विचारसरणी, व्यावसायिक शिस्त, तसेच वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्यांवर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.या एफडीपीमध्ये प्रत्यक्ष उदाहरणे, प्रेरणादायी कथा, संवादात्मक सत्रे व कृतीआधारित उपक्रम यांचा समावेश असल्याने सहभागींच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवून आणण्यास कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. सदरील कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. गणेश वाघमारे यांनी केले. प्रस्तुत उपक्रमाची चित्रफित झलक संस्थेच्या समाज माध्यमावर प्रसिद्ध केलेली आहे.

## संस्कार खिल्लारेचे नेत्र दीपक यश राष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत रौप्यपदक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शिराळ येथील ह.भ. प.हौसराव आजबे महाराज यांचा नातू मुलीचा मुलगा संस्कार सुप्रिया संजय खिल्लारे इयत्ता दहावी याने ६९ व्या. राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत तिरंदाजी क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत रौप्य पदक पटकावले आहे.



पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील दत्तनगर परिसरात राहणाऱ्या संस्कार सुप्रिया संजय खिल्लारे याने झारखंड राज्यातील रांची येथे पार पडलेल्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत तिरंदाजी धनुष्य बाण क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत भारतीय फेरीत वैयक्तिक एलिमिनेशन प्रकारात रौप्यपदक पटकावले आहे. रांची येथील बिरसा मुंडा ॲथलेटिक्स स्टेडियम येथे ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत देशभरातील सर्वोत्तम खेळाडूंशी सामना करत संस्कारने सातत्यपूर्ण,संयमी आणि आत्मविश्वासपूर्ण खेळाचे दर्शन घडवले.दबावाच्या क्षणी अचूक लक्ष्यभेदन आणि मानसिक ताकदीचे उत्कृष्ट उदाहरण त्याने सादर केले.

संस्कार हा सध्या दहावीचा विद्यार्थी असून गुरुकुल गोखळी येथे शिक्षण घेत आहे. अभ्यासासोबतच क्रीडा साधनेत सातत्य ठेवत त्याने राष्ट्रीय पातळीवर आपली क्षमता सिद्ध केली आहे.प्रशिक्षक जुबेर पठाण सर यांच्या मार्गदर्शनाखाली संस्कारने हे घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामागे त्याचे पालक संजय खिलारे व आई सुप्रिया खिलारे यांचा मोलाचा पाठिंबा लाभला आहे.संस्कारच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे इंदापूर तालुक्यातील क्रीडा क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे. संस्कारच्या या यशाबद्दल काशीबाई विश्वनाथ खिल्लारे, ह.भ.प.हौसराव आजबे,कावेरी आजबे, गणेशमामा आजबे, प्रतीक्षा आजबे, शिवाजी आजबे, गुलाब आजबे आदी शैक्षणिक,क्रीडा व सामाजिक क्षेत्रातून त्याचे अभिनंदन होत आहे. त्याच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. आष्टी शहरातील माऊली सेवा मंडळाच्या वतीने देखील संस्कार चे अभिनंदन केले आहे

## शासकीय योजना महाशिबिरासाठी पाटोद्यात मंडप उभारणीचे काम सुरू

### १००० लोकांची आसन व्यवस्था तर विविध शासकीय योजनांचे लागणार माहिती स्टॉल

पाटोदा । प्रतिनिधी

दिनांक १८ जानेवारी रोजी पाटोदा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या शासकीय योजनांच्या महाशिबिरासाठी जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. आनंद एल. यावलकर यांच्या सूचनेनुसार तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीडचे सचिव मा. वहाब ए. सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली न्याय यंत्रणा व प्रशासनाच्या वतीने पूर्वतयारीला मोठा वेग आला असून कार्यक्रमाच्या तयारीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.



हे महाशिबिर पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात पार पडणार असून यासाठी माननीय उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तसेच जिल्हा न्यायाधीश व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत या शिबिरासाठी भव्य मंडप उभारणीचे काम सुरू आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी शासनाच्या विविध योजनांचे एकूण १४ ठिकाणी स्वतंत्र स्टॉल उभारण्यात येणार असून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध योजनांचा लाभ मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या संकल्पनेतून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड, जिल्हाधिकारी कार्यालय बीड तसेच तालुका विधी सेवा समिती पाटोदा यांच्या संयुक्त विद्यमाने या महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी न्यायालयीन पातळीवरून सातत्याने नियोजन व आढावा घेण्यात येत आहे.

पाटोदा न्यायालयाचे न्यायाधीश मा. एम. ए. शिंदे तसेच सहन्यायाधीश मा. सौ. एस. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पूर्वतयारीचा आढावा घेतला जात असून कार्यक्रमातील प्रत्येक बाबीवर बारकाईने लक्ष दिले जात आहे. न्यायालयीन कर्मचारी तसेच पाटोदा वकील संघाचे पदाधिकारी व सदस्यही मोठ्या परिश्रमाने या कामात सहभागी झाले आहेत. महाशिबिराच्या पार्श्वभूमीवर पाटोदा शहर व तालुक्यातील प्रमुख चौक, रस्ते व सार्वजनिक ठिकाणी बॅनर व फ्लेक्स लावण्यात आले असून फलकांद्वारे नागरिकांना माहिती दिली जात आहे. माहितीपत्रिकांचे वाटप सुरू असून रिक्षाद्वारे अनाउन्सिंग करून नागरिकांपर्यंत कार्यक्रमाची माहिती पोहोचवली जात आहे. या महाशिबिरात तहसील कार्यालय पाटोदा, पंचायत समिती पाटोदा, नगर पंचायत पाटोदा, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, एस.टी. महामंडळ विभाग, एसबीआय बँक पाटोदा, वन विभाग, महिला व बाल विकास विभाग, सामाजिक कल्याण विभाग, एमएससीबी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पशुसंवर्धन कार्यालय तसेच जलसंधारण कार्यालय यांच्या वतीने विविध शासकीय योजनांचे स्टॉल लावण्यात येणार आहेत. या स्टॉलच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजना, महात्मा गांधी रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना आयुष्मान भारत कार्ड, रक्तदान शिबिर, शिष्यवृत्ती योजना, बचत गट योजना, कृषी व सूक्ष्म सिंचन योजना, पशुसंवर्धन व जलसंधारण विषयक योजनांची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात येणार आहे. या शासकीय योजना महाशिबिराचा लाभ पाटोदा शहर व तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने करण्यात आले आहे.



## चित्रकला ग्रेड परीक्षेत नागनाथ विद्यालयाचा १०० टक्के निकाल

बीड । प्रतिनिधी

कला संचालनालय मुंबईच्या वतीने सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ विद्यालयाचा निकाल १०० टक्के इतका लागला आहे या शाळेने चित्रकला परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे.

नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून इलेमेंटरी परीक्षेला एकूण ३४ विद्यार्थी बसले होते. ते सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे एक विद्यार्थी ग्रेड श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे व ३१ विद्यार्थी ग्रेडश्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत तर दोन विद्यार्थी ग्रेड श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत तसेच इंटरमिजीएट परीक्षेत एकूण ९ विद्यार्थी बसले होते ते सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ग्रेड श्रेणीमध्ये ६ विद्यार्थी व ग्रेड श्रेणीमध्ये ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा शाळेच्या वतीने प्राचार्य डी. बी. माटे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## पान ६ वरुन...

### अवमान प्रकरणी

ऊस परस्पर तोडून कारखान्याला घालण्यात आल्याचा आरोप पुढे आला. या पार्श्वभूमीवर आदेशाचा अवमान झाल्याचा ठपका ठेवत धर्मदाय प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे.या अवमान प्रकरणी आता राधेश्याम अट्टल यांच्यासह संबंधित ट्रस्टींना अधिकृत नोटीस बजावण्यात आलेली असून, महाराष्ट्र सार्वजनिक न्यास व्यवस्थापन अधिनियम, १९५० अन्वये पुढील कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे रामनाथ खोड दिशाभूल करत आहेत असा दावा करणारे आरोप पूर्णतः फोल ठरले असून, संपूर्ण प्रकरण कागदपत्रे व न्यायालयीन आदेशांच्या आधारे पुढे सरकत असल्याचे स्पष्ट झाले आहे.सदर प्रकरणामुळे सार्वजनिक न्यासांच्या मालमत्तेच्या संरक्षणाचा व न्यायालयीन आदेशांच्या अंमलबजावणीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### शिक्षण विभागाच्या शाळेची

शिक्षणाधिकाऱ्यांनी होकार दिल्यानंतर सी ओ थेट त्या शिक्षकापर्यंत गेली आणि त्यांनी विचारपूस केली त्यावेळी कळाले की या ठिकाणी चार शिक्षक कार्यरत आहेत विद्यार्थी संख्या २१ आहे २१ विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी चार शिक्षकांची नियुक्ती आहे मात्र विद्यार्थी इतर शाळेत असल्याचे सांगण्यात आले तेव्हाच शिवणी शिक्षण अधिकाऱ्याकडे पाहत येथे चार शिक्षकांची काय गरज असा प्रश्न केला त्यावर एक शिक्षक म्हणाला इथं कार्यालय देखील आहे टीसी द्यावे लागतात तेव्हा शिव म्हणाले टीसी देण्यासाठी एवढ्या शिक्षकांची गरज भासते का त्यावर शिक्षण अधिकाऱ्यांना सांगताना या शिक्षकांचे इतर ठिकाणी समायोजन करा असे निर्देश त्यांनी दिले त्यावर शिक्षण अधिकाऱ्यांनी लवकरच काहीतरी निर्णय घेऊ असे सांगितले विशेष म्हणजे ग्रामीण भागामध्ये शिक्षक नसल्यामुळे शाळा बंद पडत आहेत अनेक पालक आणि विद्यार्थी शिक्षकांसाठी मोर्चे आंदोलने करतात मात्र जिथे विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे आणि शिकवणी देखील कमीच आहे अशा ठिकाणी मात्र चार चार शिक्षक देऊन शिक्षण विभागच पाठ राखण करत असल्याचे यातून दिसून येत आहे

### माजी आ.भीमराव

अभिनंदन केले.धार्मिक कार्यात्मिक संकोचपणे धर्म वाढवण्यासाठी आवर्जून उपस्थित असतो.सर्व नागरिकांनी आणि भाविक भक्तांनीही अशा धार्मिक उपक्रमात सहभागी झाले पाहिजे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.या संगीत राम कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मानवी जीवनामध्ये सत्य,संयम,कष्ट, परिश्रम माणुसकी, मानवता, एकोपा, ऐक्य आणि सर्वधर्मसमभाव ही मूल्य मौल्यवान असतात.या मूल्याला अधोरेखित करण्याचे काम अर्थातच धर्म करीत असतो. त्या अनुषंगाने मानवता वादाचा सर्वांनी पुरस्कार करून अशा कथा निरूपणाला आवर्जून उपस्थित राहण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. यावेळी सौ प्राजक्ताताई धस, शैलजा थोरवे, सुखलाल मुथा, दिनकरराव तांदळे,अशोकदेवा जोशी, माजी सरपंच नामदेव राऊत, डॉ. मधुकर हंबर्डे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,उत्तम बोडखे,प्रवीण पोकळे,सचिन रानडे,शरद रेडेकर,हौसराव आजबे,सतीशशेठ धस आदि सामाजिक, राजकीय, धार्मिक, क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कथाकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या पवित्रवाणीचा सुगंध दरवळला!

आपल्या पवित्रवाणीतून आणि केलेल्या अभ्यासातून रामायणातील अनेक प्रसंग साक्षात जिवंत करण्याचे हातोटी आणि कौशल्य ह.भ.प. मंदार महाराज रामदासी यांना लाभलेले आहे. त्यांच्या वाणीतून अनेक भाविक भक्तांमध्ये अध्यात्म समर्पणाचा भाव निर्माण होण्याची प्रेरणा निर्माण होईल असा विश्वास व्यक्त करत ह.भ.प.मंदार महाराज यांच्या कथा निरूपण कौशल्याचे मनापासून माजी आ.भीमराव धोंडे यांनी कौतुक केले आणि आयोजकांनाही धन्यवाद दिले.

### नगराध्यक्षा पारवे यांनी

संदीप क्षीरसागर यांनी अजित पवार गटाला पाठिंबा दिला. त्यामुळे ठरलेल्या वेळेपूर्वी डॉ.क्षीरसागर यांनी आपला अर्ज माघारी घेतल्याने विनोद मुळूक यांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर स्वीकृत सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांनी मनमानी करत स्वतःच्या पक्षाचे तीन सदस्य निवडून आणले. हा संपूर्ण प्रकार नियमबाह्य व घटनाबाह्य असल्याचे सांगत, याविरोधात आपण भाजप गटनेता म्हणून बीडचे जिल्हाधिकारी व राज्याच्या नगरविकास मंत्र्यांकडे तक्रार करणार असल्याचेही डॉ.क्षीरसागर यांनी सांगितले.

नवनियुक्त स्वीकृत सदस्य गोविंद शिराळे यांचा सत्कार

गोविंद नवनाथ शिराळे यांची बीड नगर परिषदेच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर, गटनेत्या डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांनी अभिनंदन केले. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, नागेश तांबारे, सय्यद मुस्तफा, बाळासाहेब गुजर, मंगेश धोंगडे, राहुल गुरखुदे, सनी माने, राकेश जाधव, नंदू पिंगळे, कपिल सोनवणे, मंगेश सानप, योगेश भागवत आदी उपस्थित होते.

### आ. प्रकाशदादा सोळंके

संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. याच कार्यक्रमाअंतर्गत आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त भेटवस्तूऐवजी शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य देण्याचे आवाहन करण्यात आले होते. या आवाहनाला नागरिक, संस्था, शिक्षक, पालक व व्यापाऱ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमातून – ५०,००० वह्या (नोटबुक्स),मोठ्या प्रमाणावर पेन व पेन्सिली, फर्स्ट स्टेज बॉक्स (शालेय साहित्य संच) असे एकूण सुमारे १० लाख रुपये किमतीचे शैक्षणिक साहित्य स्नेहभेट मतदार संघातील सर्वसामान्य जनतेने दिले. हे साहित्य लवकरच ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांना विविध शाळांमार्फत वितरित करण्यात येणार आहे. वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करून समाजासाठी काहीतरी देण्याची प्रेरणा मिळावी, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला असून, नागरिकांनीही या उपक्रमात सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपली. त्यामुळे हा उपक्रम केवळ उत्सव न राहता सामाजिक चळवळ ठरत असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकनेते सुंदर रावजी सोळंके सहकारी नागरी पतसंस्था, माजलगाव सहकारी मध्यवर्ती ग्राहक भांडार, सिंदफणा पब्लिक स्कूल, जिजामाता नर्सिंग अँड फिजिओथेरपी कॉलेज, सुंदर रावजी सोळंके महाविद्यालय,शिक्षक व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले तसेच कानिफनाथ विद्यालय मोहखेड,या सर्व संस्थांनी महत्त्वाची भूमिका निभावली. सर्व सहकार्यकर्त्यांचे व दानशूर नागरिकांचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.

### माजलगावच्या इतिहासात

बिलाल चाऊस या नगराध्यक्ष झाल्या व सत्तास्थाने आपल्या कडेच आसल्याने मिच शहराचा विकास करु शकतो आशी वल्गना करणाऱ्या आ.प्रकाश सोळंके यांच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारा बाबत आ. सोळंकेच्या नगरसेवकाकडुन जातीयवाद झाल्याचे निकालावरून स्पष्ट दिसुन आले आहे. तरी नगरपालिकेची सत्ता गेल्याने अस्वस्थ झालेले आमदार प्रकाश सोळंके यांनी आपली राजकीय कुटनितीचा वापर करत.बहुजन विकास मोर्चाचे बाबुराव पोटभरे यांच्या मदतीने मोहन जगताप यांना धोबीपछाड करण्याची व्याहुरचनेत उपनगराध्यक्षपदी साहाल चाऊस यांची निवड करुन आमदार प्रकाश सोळंके हे यशस्वी झाले आहेत.

# पीक काढणीपूर्वीच हरभऱ्याचे भाव घसरले

## शेतकऱ्यांनी जगायचे कसे? केंद्राच्या हस्तक्षेपाची सिद्धरामय्यांची मागणी

पुणे : नवीन हरभरा पीक काढणीपूर्वीच बाजारात त्याचे भाव किमान आधारभूत किमतीच्या खाली घसरले आहे. या प्रश्नी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केंद्राचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी त्यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांना पत्र लिहिले आहे. तीव्र आर्थिक संकटाच्या परिस्थितीचा सामना करणाऱ्या हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती त्यांनी पत्रातून केली आहे.

१४ जानेवारी रोजी पाठवलेल्या पत्रात सिद्धरामय्या यांनी, कर्नाटकातील हरभरा उत्पादक शेतकरी तीव्र संकटाला सामोरे जात असल्याचे म्हटले आहे. कारण पीक काढणी हंगाम सुरू होण्याआधीच हरभऱ्याचे भाव हमीभावापेक्षा खूपच खाली आले आहेत. शेतमाल दरातील ही घसरण केवळ बाजारातील अपवादात्मक परिस्थिती नव्हे तर हे मानवी संकट आहे. यामुळे धारवाड, गदग आणि कलबुर्गी सारख्या जिल्ह्यांतील लहान आणि सीमांत शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. त्यांनी पत्रात शेतकऱ्यांच्या परिस्थिती निदर्शनास आणून दिली आहे. केंद्राने २०२६-२०२७ च्या



रब्बी हंगामासाठी प्रतिक्विंटल ५,८७५ रुपये किमान आधारभूत किंमत जाहीर केली. असे असले तरी, प्रमुख कृषी उत्पन्न बाजार समितीत प्रत्यक्ष भाव ४,२६० रुपये आणि ५,८१३ रुपयांच्या खाली आहेत. शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल हमीभावापेक्षा ८०० ते १,२०० रुपयांनी कमी दराने विकावा लागत आहे. ही तीव्र आणि तत्काळ संकटाची परिस्थिती असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. सिद्धरामय्या यांनी हमीभाव यंत्रणेच्या विश्वासार्हतेचे महत्त्व अधोरेखित करत सूचित केले आहे की, जाहीर केलेल्या हमीभावानुसार शेतमालाची खरेदी होत नसेल, तर शेतकऱ्यांच्या हितासाठी असलेल्या संस्थात्मक व्यवस्थेवरील विश्वास कमी होतो. एकूण ९.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर पीक लागवड झाली असून सुमारे ६.२७ लाख मेट्रिक टन उत्पादनाचा अंदाज आहे. अनेक महिन्यांच्या मेहनतीनंतर काढणीला येत असलेले पीक अनेक कुटुंबांचे एकमेव उत्पन्नाचे साधन आहे. पण, सध्याच्या परिस्थितीती तत्काळ हस्तक्षेप न झाल्यास भाव आणखी कोसळण्याची भीती आहे, असा इशाराही त्यांनी दिला आहे. कारण जानेवारी ते मार्चदरम्यान बाजारात मोठ्या प्रमाणात आवक वाढते. या प्रकरणी तत्काळ हस्तक्षेप करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. त्यांनी केंद्र सरकारला किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदीला मंजुरी द्यावी आणि नाफेड सारख्या एजन्सींना उशीर न करता खरेदी केंद्रे सुरु करण्याचे निर्देश देण्याची विनंती केली आहे. त्यांनी पुढे म्हटले की, ही वेळ खूप महत्त्वाची आहे आणि खरेदीविना जात असलेला प्रत्येक दिवस शेतकऱ्यांचे नुकसान वाढवणारा ठरत आहे. हमीभावात खरेदी ही केवळ एक प्रशासकीय प्रक्रिया नव्हे, तर ती देशाच्या शेतकऱ्यांच्या हितासाठी असलेल्या वचनबद्धतेची पुष्टी आहे.




### महत्वाच्या घटना

१६५९ : पहिला धनादेश ब्रिटीश बँकेतून काढण्यात आला, तो नँशनल वेस्टमिन्स्टर बँकेत जपून ठेवण्यात आला आहे.

१७०४ : औरंगजेबाने राजगड जिंकून त्याचे नाव नबीशाहगड असे ठेवले.

१९१८ : लिथुएनियाने (रशिया व जर्मनीपासून) स्वातंत्र्य जाहीर केले.

१९५९ : फिडेल कॅस्ट्रो क्यूबाच्या अध्यक्षपदी

१९६० : अमेरिकी अणुपाणबुडी ट्रायटन ने पाण्याखालून पृथ्वी प्रदक्षिणा करण्यास प्रस्थान केले.

१९६९ : मिर्झा गालिब यांच्या १०० व्या पुण्यतिथी निमित्ताने डाक तिकीट जारी केल्या गेले.

१९८५ : लेबनॉनमध्ये हिजबोल्ला या कट्टरपंथीय शिया मुस्लिम संघटनेची स्थापना.

१९८२ : कोलकत्ता येथे जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रीय गोल्ड कप फुटबॉल स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.

२००८ : प्रसिद्ध गायक नितीन मुकेश यांना मध्य प्रदेश सरकार फ कडून लता मंगेशकर पुरस्कार देण्यात आला.

२००८ : बिहार च्या नितीश कुमार यांनी मुख्यमंत्री कन्या विवाह योजनेचे उद्घाटन करण्यात आले आहेत.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२२२ : जपानमधील निचिरेन बौद्ध पंथाचे स्थापक निचिरेन यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑक्टोबर १२८२)

१७४५ : माधवराव बल्लाळ भट ऊर्फ 'थोरले' माधवराव पेशवे मराठा साम्राज्यातील ४ था पेशवा, १६ व्या वर्षी पेशवेपदावर विराजमान झालेला अत्यंत कर्तबगार पेशवा. पानिपतच्या युध्दानंतर विस्कटलेली मराठेशाहीची घडी त्यांनी बसविली. (मृत्यू: १८ नोव्हेंबर १७७२)

१८२२ : बोटांचे ठसे, रंगांधळेपणा आणि स्त्रियांच्या सौंदर्यावर संशोधन करणाऱ्या सर फ्रान्सिस गाल्टन यांचा जन्म.

१८७६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (मृत्यू: ६ मे १९६६)

१९०९ : मॅकडोनाल्ड चे सहसंस्थास्थापक रिचर्ड मॅकडोनाल्ड यांचा जन्म. (मृत्यू: १४ जुलै १९९८)

१९२० : प्रसिद्ध भारतीय चित्रपट अभिनेता आई.एस. जोहर यांचा जन्म.

१९३७ : प्रसिद्ध चित्रकार गुलाम मोहम्मद शेख़ यांचा जन्म.

१९४१ : उत्तर कोरिया चे माजी प्रशासक किंम जोंग इल यांचा जन्म.

१९४८ : भारतीय चित्रपट कलाकार हैदर अली यांचा जन्म.

१९५४ : मायकेल होल्डिंग वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू

१९६१ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित प्रसिद्ध गायक शेखर सेन यांचा जन्म.

१९६४ : बेबेटो ब्राझीलचा फुटबॉलपटू

१९७७ : प्रसिद्ध दक्षिणात्य चित्रपट अभिनेता दर्शन थुगुडीपा यांचा जन्म.

१९७८ : वासिम जाफर भारतीय क्रिकेटपटू

१९९७ : प्रसिद्ध कब्बडी प्लेयर परदीप नरवाल चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४४ : धुंडिराज गोविंद ऊर्फ 'दादासाहेब' फाळके भारतीय चित्रपट उद्योगाचे जनक, लेखक, छायाचित्रकार, दिग्दर्शक, संकलक, वेशभूषाकार, कलादिग्दर्शक इ. अनेक जबाबदार्या ते सांभाळत असत. (जन्म: ३० एप्रिल १८७० त्र्यंबकेश्वर, नाशिक, महाराष्ट्र)

१९५६ : मेघनाद साहा खगोलभौतिकशास्त्रज्ञ व संसदसदस्य. तार्यांच्या वातावरणाचे तापमान आणि आयनीभवन यांचा संबंध स्पष्ट करणारा सिद्धांत त्यांनी मांडला. भारताचे स्वत:चे राष्ट्रीय पंचांग त्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले. (जन्म: ६ आक्टोबर १८९३)

१९६८ : नारायणराव सोपानराव बोरावके कृषी शिरोमणी, पहिले मराठी साखर कारखानदार, पुणे, सोलापूर व नगर जिल्ह्यांत अनेक संस्था व उद्योग त्यांनी उभे केले. संशोधित फळांच्या उत्पादनास त्यांनी प्रोत्साहन दिले. १९३३ मध्ये त्यांना 'रावसाहेब' तर १९४६ मध्ये त्यांना 'रावबहादूर' हे किताब मिळाले. शेतीच्या आधुनिकीकरणावर त्यांनी भर दिला. (जन्म: १७ आक्टोबर १८९२)

१९९४ : पं. निवृत्तीबुवा सरनाईक जयपूर-अत्रौली घराण्याचे गायक (जन्म: ४ जुलै १९१२)

१९९६ : आर. डी. आगा उद्योगपती, थरमॅक्स उद्योगसमुहाचे संस्थापक (जन्म:)

२००० : बेल्लारी शामण्णा केशवन आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ग्रंथालयशास्त्रज्ञ, पद्मश्री, 'इंडियन नॅशनल सायंटिफिक डॉक्युमेंटेशन सेंटर'चे पहिले संचालक

२००१ : रंजन साळवी 'पिंजरा', 'सवाल माझा ऐका', 'केला इशारा जाता जाता' आदी मराठी चित्रपटांचे नृत्यदिग्दर्शक (जन्म:)

# देशाच्या फक्त २% शेतांमध्ये होतेय ऑरगॅनिक शेती



शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे फार महत्वाचे आहे. पारंपारिक शेतीच्या तुलनेत शाश्वत शेती जमीन खराब होणे, भूजल अधोगती आणि जैवविविधता कमी करणे यासारख्या आव्हानांचा सामना करण्यास अधिक सक्षम आहे. याद्वारे, भारत पोषण सुरक्षा प्रदान करण्यास सक्षम होईल आणि हवामान बदलांच्या आव्हानांचा सामना करण्यास देखील सक्षम असेल. ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेने आपल्या शाश्वत शेतीमधील भारतातील अहवालात हे सांगितले आहे. या अहवालात भारतातील शाश्वत शेतीच्या दर्जाबरोबरच त्यात सुधारणा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. अहवालानुसार शाश्वत शेती ही भारताच्या शेतीत खूपच कमी आहे. येथे बर्याच टिकाऊ शेतीचे ५ उपक्रम (मुख्यत: पीक रोटेशन, एग्रोफॉरेस्टिंग, रेन वॉटर हार्वेस्टिंग, मल्चिंग आणि प्रसिजन शेती) स्वीकारले गेले आहेत. ते देखील एकूण शेतीच्या पाच टक्के जमिनीवर. शाश्वत शेतीची आधुनिक पद्धत देशातील फक्त ५० लाख शेतकरी म्हणजेच फक्त ४ टक्के वापरतात.शाश्वत शेतीचे केले जाणारे प्रकार : क्रॉप रोटेशन - ३ कोटी हेक्टर आणि दीड कोटी शेतकरी त्याचा अवलंब करतात. ॲग्रो फॉरेस्टिंग - बहुतेक मोठे शेतकरी याचा वापर २.५ दशलक्ष हेक्टरवर करतात. रेन वॉटर हार्वेस्टिंग - २ ते २७ दशलक्ष हेक्टर. सेंद्रिय शेती - २८ लाख हेक्टर म्हणजे एकूण १४ कोटी हेक्टरपैकी फक्त २ टक्के.नैसर्गिक शेती - हे वेगाने विकसित होत आहे, ८ लाख शेतकऱ्यांनी त्याचा अवलंब केला आहे. एकात्मिक कीड व्यवस्थापन - अनेक दशकांच्या प्रयत्नांनंतर हे ५० लाख हेक्टर क्षेत्रावर अवलंबले गेले आहे.

# 'या' जातीच्या मेंढ्या वर्षातून ६ ते ८ कोकरांना देतात जन्म

मांस तसेच लोकर व्यवसाय करण्यासाठी देशात बहुतेकजण आता मेंढ्यापालन व्यवसायाकडे वळलेले आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय लोकप्रिय होत आहे, कारण त्यात कमी खर्चात जास्त नफा मिळतो. तसेच मांसाबरोबरच लोकरीलाही बाजारात मोठी मागणी आहे. विशेष म्हणजे मेंढीपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध राज्यांतील सरकारे शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देत आहेत. मात्र असे असतानाही केवळ सुधारित जातींची माहिती नसल्यामुळे बहुतेक मेंढीपालकांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. 'अविशान' ही मेंढ्यांची प्रगत जात असून त्याचे वजन खूप वेगाने वाढते. या जातीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाच वेळी ३ ते ४ कोकरांना जन्म देते. त्याचबरोबर 'अविशान' जातीच्या मेंढ्या वर्षातून दोनदा गर्भधारणा करतात. म्हणजेच ती एका वर्षात ६ ते ८ मुलांना जन्म देऊ शकते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी 'अविशान' जातीच्या मेंढ्या पाळल्यास त्यांना मोठा नफा मिळेल. ते मांस तसेच लोकर मोठ्या प्रमाणावर विकू शकतात.

अविशान मेंढ्यांचा इतिहास : अविशान मेंढ्यांचा क्लोन तयार करण्यासाठी शास्त्रज्ञांना खूप मेहनत घ्यावी लागली. १९९७ मध्ये पश्चिम बंगालमधील सुंदरबन येथून गारोल जातीच्या मेंढ्या आणण्यात आल्या. यानंतर मालपुरा येथील मेंढ्यांसह या जातीचा क्रॉसिंग करून क्लोन तयार करण्यात आला. परंतु शास्त्रज्ञांना पूर्ण यश मिळाले नाही. कारण या मेंढ्यांच्या जातीचा मृत्यूदर जास्त होता. शिवाय दूध देण्याची क्षमताही कमी होती. यानंतर गुजरातच्या पाटणवाडी जातीच्या मेंढ्या मालपुरा येथील मेंढ्यांसह क्रॉस करण्यात आल्या. मग मेंढीची प्रगत जात ''अविशान'' जन्माला आली. हे सामान्य जातीच्या मेंढ्यांपेक्षा जास्त दूध देते. शिवाय, त्याची प्रजनन क्षमता देखील जास्त आहे. वर्षातून दोनदा गर्भधारणा होते.केवळ ५ टक्के मृत्युदर : अविशान कोकरू इतर जातीच्या मेंढ्यांपेक्षा ३० टक्के वेगाने वाढतात. कोकरे जन्मानंतर लगेचच विक्रीसाठी तयार होतात, त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्च येतो. सध्या उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश, राजस्थानसह अनेक राज्यांतील शेतकरी अविशान मेंढ्या मोठ्या प्रमाणावर पाळत आहेत. या मेंढ्यांच्या मृत्यूचे प्रमाण केवळ ५ टक्के आहे. मांसासाठी ३ महिन्यांचे कोकरू विकता शकता. एक कोकरू साधारणपणे २५०० रुपयांना विकले जाते. जर तुम्ही ५० मेंढ्यांसह अविशान शेती सुरू केली असेल तर तुम्ही एका वर्षात किमान २०० कोकरू विकू शकता.



# रब्बी ज्वारीवर मावा-चिक्का रोग; कृषी विभागाकडून मोलाचा सल्ला

अनेक भागांत रब्बी हंगामातील ज्वारी पिकावर मावा आणि चिक्का या रोगांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव दिसून येत असतो. ज्वारीचे पीक सध्या निवडीच्या आणि परिपक्वतेच्या टप्प्यावर असताना या किडींचा हल्ला झाल्यास शेतकऱ्यांसाठी तो चिंतेचा विषय ठरतो.

या रोगांमुळे ज्वारीची पाने पिवळी पडत असून, कणसांची वाढ थांबण्याची शक्यता आहे. त्यामुळे एकूण उत्पादनात मोठी घट होण्याचा धोका निर्माण झाला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होत असल्याचे चित्र दिसत आहे. सकाळच्या वेळेस वातावरण थंड असते, तर दुपारनंतर अचानक तापमान वाढते. या बदलत्या हवामानाचा थेट परिणाम ज्वारी पिकावर होत असून मावा आणि चिक्का रोगाचा प्रसार वेगाने वाढत आहे.

अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी महागडी कीटकनाशके फवारली असली तरीही अपेक्षित परिणाम मिळत नसल्याचे दिसून येत आहे. काही शेतांमध्ये तर ज्वारीची पाने पूर्णपणे पिवळी पडत असून पिकाची ताकद कमी होत चालली आहे. सध्या निसर्गाचा लहरीपणा वाढलेला असून,



कोणत्या हंगामात कोणते पीक घ्यावे, याबाबत शेतकरी संभ्रमात पडले आहेत. पूर्वी ऋतू ठरलेले असायचे, मात्र आता तिन्ही ऋतूंमध्ये मोठा बदल झाल्याचे जाणवत आहे. मागील वर्षी खरीप हंगाम समाधानकारक गेला नाही आणि आता रब्बी हंगामातील पिकांवरही रोगांचा फटका बसत आहे. त्यामुळे रब्बी हंगामाकडून असलेल्या अपेक्षा हळूहळू कमी होत चालल्या असल्याची भावना अनेक शेतकरी व्यक्त करत आहे.हवामान सतत बदलत असल्यामुळे शेती करणे अधिक कठीण झाले आहे. पिकावर खर्च वाढत आहे, मात्र त्यानुसार उत्पादन मिळेल की नाही, याची खात्री राहिलेली नाही. रब्बी ज्वारीवर आलेल्या मावा आणि चिक्का रोगामुळे शेतकऱ्यांमध्ये नैराश्य पसरले आहे.

शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाच्या सूचना :

कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोरडवाहू रब्बी ज्वारी पिकाला पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी पाणी देणे आवश्यक आहे. जर दोन वेळा पाणी देणे शक्य असेल, तर गर्भावस्था आणि पोटरी अवस्था या नाजूक टप्प्यावर पाणी दिल्यास पिकाची वाढ चांगली होते. योग्य ओलावा व्यवस्थापन केल्यास ज्वारीच्या उत्पादनात सुमारे २० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते.हवामानातील सततच्या बदलांमुळे मावा आणि चिक्का रोगाचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सकाळचा गारवा आणि दिवसा वाढणारे तापमान या किडींसाठी पोषक ठरत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# पर्यावरणीय बदलांमुळे शेती समोरील समस्यात वाढ होत आहे.- प्रा. डॉ.सावंत

गेवराई। प्रतिनिधी

पर्यावरणातील झपाट्याने होत असलेले बदल, अनियमित पर्जन्यमान, वाढते तापमान आणि नैसर्गिक आपत्ती यांचा थेट परिणाम शेती व्यवसायावर होत असून यामुळे शेतकऱ्यांसमोरील समस्या अधिक गंभीर होत चालल्या आहेत, असे प्रतिपादन प्रा. डॉ. कैलास सावंत यांनी केले. ते मौजे मुधापुरी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिरात 'पर्यावरणातील बदल व शेती समस्या' या विषयावरील व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड हे होते.




जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागाचे विशेष शिबिर मौजे मुधापुरी येथे सुरू आहे. आज सकाळच्या सत्रामध्ये रासेयो स्वंयसेविकांनी गावांमध्ये स्वच्छता अभियान राबवून शाळा, मंदिर परिसर व प्रमुख रस्त्यांची स्वच्छता केली. यासाठी गावातील ग्रामस्थ यांनी सहकार्य केले. बौद्धिक सत्रांमध्ये बोलताना प्रा. डॉ. कैलास सावंत म्हणाले की, हवामान बदलामुळे निसर्गाचा समतोल बिघडत चालला आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पर्जन्यमान कमी-अधिक होऊन पावसावर अवलंबून असणारी शेती तोट्यात जात आहे. यामुळे शेतकऱ्यांसमोरील समस्या अधिक गंभीर होत चालल्या आहेत. शाश्वत शेती, सेंद्रिय पद्धतींचा अवलंब, जलसंधारण आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड यांनी पर्यावरण संरक्षण व शेती यांचा अतूट संबंध अधोरेखित करत, विद्यार्थ्यांनी या विषयाकडे केवळ अभ्यासापुरते न पाहता सामाजिक जबाबदारीच्या दृष्टीने पाहावे, असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. शिवाजी दिवाण यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. संगीता आहेर यांनी तर कू. गुंजन धापसे हीने उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास ग्रामस्थ व स्वंयसेविका उपस्थित होत्या.

## धनगर आरक्षणासाठी बीडमधून हजारो बांधव मुंबईला जणार: बाबुलाल ढोरमारे

### २१ जानेवारी रोजी आझाद मैदान येथे दिपक बोराडे यांचे अमरण उपोषण

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्रातील धनगर समाजाचे गेल्या ७० वर्षापासून एसटी आरक्षणासाठी आंदोलन सुरूच असून मराठा समाजाच्या पाठोपाठ धनगर समाजानेही आता चलो मुंबईचा नारा दिपक बोराडे यांच्या नेर्तवाखाली केला असून दि. १७ जानेवारी रोजी दिपक बोराडे हे जालना येथून मुंबईकडे निघार असून दि. २१ जानेवारी रोजी मुंबई येथे आझाद मैदान येथे अमरण उपोषण करणार असून त्यांना पाठिंबा देण्यासाठ बीड जिल्ह्यातील लाखो समाज बांधव मुंबईकडे निघण्याचे आवाहन धनगर समाज संघर्ष समिती बीड जिल्हा अध्यक्ष बाबुलाल ढोरमारे यांनी केले.

धनगर समाजाला एसटी प्रवर्गाचे आरक्षण मिळावे यासाठी अनेक धर्तीवर मोर्चे, आंदोलने करण्यात आलेली आहेत. जालना येथे धनगर समाजाने दिपक बोराडे यांच्या नेतृत्वाखाली मोठी ताकद सरकारला दाखवून दिली. आता मराठा समाजापाठोपाठ धनगर समाजानेही एसटी आरक्षणासाठी मुंबईचा रस्ता धरला असून राज्यभरातून मोठ्या संख्येने समाज बांधव मुंबईकडे निघणार आहे. मुंबई येथील आझाद मैदान येथे दिपक बोराडे ये दि. २१ जानेवारी पासून अमरण उपोषण करणार असून त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी दिपक बोराडे यांनी केले आहे. त्यांच्या हाकेला ओ देण्यासाठी जिल्ह्यातून लाखो समाज बांधव मंबईकडे निघणार आहे. तसेच बीड तालुक्यातील मोठा समाज बांधव मंबईकडे घेवून जाणार असल्याचे मत धनगर समाज संघर्ष समिती बीड जिल्हा अध्यक्ष बाबुलाल ढोरमारे यांनी पत्रकारत कळविले आहे. मंबईकडे जाणाऱ्या बांधवाला प्रवासादरम्यान काही अडचण निर्माण झाल्यास संपर्क साधण्याचे आहवानही बाबुलाल ढोरमारे यांनी केले आहे.

## हिंद-की-चादर अंबड नगर परिषदेची बैठक संपन्न



अंबड। प्रतिनिधी

नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी होणाऱ्या 'हिंद-की-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त अंबड नगर परिषदेत आज मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्या अध्यक्षेत बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीत जिल्हाधिकारी यांनी 'हिंद की चादर' कार्यक्रमाच्या अनुषंगाने दिलेल्या सूचना आणि मार्गदर्शनानुसार चर्चा करुन नांदेड येथील कार्यक्रमासाठी अंबड शहरामार्फत तसेच प्रशासनामार्फत कोणत्या सेवा देता येईल याबाबतचे नियोजनासाठी चर्चा करण्यात आली.

यावेळी बैठकीस नगर परिषद प्रशासनातील अधिकारी यांच्यासह विविध समाजातील प्रतिनीधी यांची उपस्थिती होती.

## फिल्मी स्टाईल दरोडा! १० दरोडेखोरांनी 'असा' रचला डाव; लाखाचा ऐवज लंपास

अहिल्यानगर। प्रतिनिधी

नगर-पुणे महामार्गावरील सुपा परिसरात गुन्हेगारीच्या घटनांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. सुपा-शहाजापूर रोडवरील तांगडे व वस्तीवर सोमवारी मध्यरात्री अज्ञात दरोडेखोरांच्या टोळीने धाडसी दरोडा टाकला. कोयत्याचा धाक दाखवत तब्बल ९० हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी रावासाहेब मारुती तांगडे ( रा. तांगडे वस्ती, सुपा-शहाजापूर रोड, ता. पारनेर ) यांनी फिर्याद दिली.

फिर्यादी रावसाहेब तांगडे कुटूंबासह सुपा-शहाजापूर रोडवरील झरेकर वस्तीवर वास्तव्यास आहे. घटना घडल्याच्या दिवशी त्यांची विवाहित मुलगी देखील आजारी असल्याने माहेरी आली होती. १३ जानेवारी रोजी रात्री फिर्यादी घराबाहेरील कुत्रे जोरात भुंकू लागल्याने बाहेर आले. दरम्यान, अंगणात काळे कपडे घातलेले आणि तोंडाला काळा रुमाल बांधलेले ८ ते १० इसम उभे होते. त्यांनी फिर्यादी रावसाहेब यांना बळजबरीने घरात नेले, खुर्चीवर बसवले. हातातील कोयत्याचा धाक दाखवत त्यांच्या पत्नी मुलीकडील दागिने बळजबरीने हिसकावले. विशेष म्हणजे मुलीच्या हातातील सोन्याची अंगठी निघत नसल्याने नराधम दरोडेखोरांनी ती 'कटर'च्या साह्याने कापून काढली. मुख्य घरात लूट केल्यानंतर दरोडेखोरांनी तांगडे कुटुंबियांना बाहेरून कोंडून घेतले. त्यानंतर त्यांनी जवळच एकट्या राहणाऱ्या रावसाहेब यांच्या वृद्ध आईच्या घरावर मोर्चा वळवला. तिथेही दरवाजा उचकटून आत प्रवेश केला आणि वृद्ध मातेला मारहाण करून त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मणी, कर्णफुले आणि कंबरेच्या पिशवीतील ८ हजार रुपये रोकड लंपास केले असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष ओमने, स्थानिक गुन्हे शाखेचे किरणकुमार कबाडी आणि पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तपासासाठी फॉरेन्सिक व्हॅन, डॉग स्कॉड आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले असून, पुढील तपास पोलीस करत आहे. या घटनेमुळे सुपा परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, दरोडेखोरांच्या टोळीला तात्काळ जेरबंद करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

## अहिल्यानगर शहरात फतव्यांचा खेळ-आ.जगताप

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शहरातील प्रभाग क्रमांक ५ आणि १० मध्ये एका विशिष्ट समाजाकडून मतदारांची दिशाभूल करणारे फतवे काढले जात असून नागरिकांना पाकिटामधून पैसे, पत्रके व मतदानाबाबत सूचना दिल्या जात असल्याचा आरोप आमदार संग्राम जगताप यांनी केला आहे. यासंदर्भातील एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

या व्हायरल व्हिडीओच्या पार्श्वभूमीवर आमदार जगताप यांनी माध्यमांशी संवाद साधताना तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. ते म्हणाले की, व्हिडीओमध्ये एका राजकीय पक्षाचे नेते समोर बसलेले असताना संबंधित व्यक्ती ''आपने कौम के ऊपर ही महापौर बैठने मांगता है'' असे वक्तव्य करताना दिसत आहे. हा प्रकार अत्यंत दुर्दैवी असून यामुळे समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे. आमदार जगताप पुढे म्हणाले की, अशा प्रकारच्या कृतींमुळे देशाचे नुकसान होत असून याची सुरुवात याच लोकांकडून होते. या संदर्भातील पुरावे अहिल्यानगरवासीयांसमोर आहेत, असा दावाही त्यांनी केला. दरम्यान, हिंदू मतदारांनी सावध राहून निवडणुकीच्या माध्यमातून जागृत भूमिका घ्यावी, असे आवाहनही आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे

## पिंपळगव्हाण येथे पाणंद रस्ते योजना राबविण्यासाठी ग्रामसभा

केज । प्रतिनिधी

ग्रामपंचायत पिंपळगव्हाण येथे मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना '' सुरू करणे व राबवण्याकरिता सोपी व सुलभ कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी सरपंच सचिन राजेभाऊ गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच शेलाजी महादेव घोळवे, ग्रा.प.सदस्य,ग्रामपंचायत अधिकारी श्री.ए.एम.शिंदे साहेब,महसूल सहाय्यक(तलाठी)श्री. गोकुळ नादरगे साहेब,पर्यवेक्षक जि.प.शाळेचे केंद्र प्रमुख श्री.केदार सर शेतीनिष्ठ शेतकरी,ग्रामस्थ सर्वांच्या उपस्थितीत मकर संक्रांती निम्मित सर्वांनी तिळगुळाचा स्वाद घेऊन विशेष ग्रामसभेची सुरुवात करण्यात आली.



शासन निर्णयानुसार शेतामध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी इत्यादी कामांसाठी तसेच शेतीमाल बाजारात पोहोचविण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक आहे. यांत्रिकीकरणामुळे शेतीतील कामांसाठी यंत्रसामग्रीचा वापर वाढत असल्यामुळे शेतापर्यंत पोहोचण्यासाठी चांगले रस्ते असणे गरजेचे आहे.शेतकरी ग्रामस्थ मंडळींच्या मागणीनुसार शासन निर्णय प्रमाणे सभेत चर्चा करून मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्त्याविषयी निर्णय घेण्यात आला. उपस्थित ग्रामस्थ व अधिकारी सर्वांचे आभार मानून आजची विशेष ग्रामसभा संपन्न झाली असे सरपंच सचिन राजेभाऊ गायकवाड यांनी जाहीर केले.

## शेतीतील उल्लेखनीय योगदानासाठी चंद्रशेखर भडसावळे यांना राष्ट्रपती भवनाचे विशेष निमंत्रण

नवी दिल्ली। प्रतिनिधी

भारत देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात आयोजित होणाऱ्या विशेष 'अॅट होम' स्वागत समारोहासाठी देशभरातील सुमारे २५० विशेष व्यक्तींना माननीय राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या वतीने निमंत्रण देण्यात आले आहे. या निमंत्रणांमध्ये विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा समावेश आहे.

यामध्ये महाराष्ट्रातील सगुणा बाग चे संस्थापक आणि कृषिरत्न श्री. चंद्रशेखर हरि भडसावळे यांचाही समावेश आहे. शेती, नैसर्गिक शेती, शून्य-नांगरणी तंत्र, जलसंवर्धन , कृषी पर्यटन आणि ग्रामीण विकास क्षेत्रातील त्यांच्या दीर्घकाळातील अथक प्रयत्न



आणि उल्लेखनीय कामगिरीसाठी त्यांना हे विशेष निमंत्रण प्राप्त झाले आहे.

श्री. चंद्रशेखर भडसावळे हे १९७६ पासून शेती करत असून, त्यांनी आपल्या सगुणा बाग ला (नेरळ, जिल्हा रायगड) एक आदर्श एकात्मिक शेती, मत्स्यव्यवसाय, वनशेती, फलोत्पादन, गाई-गुरांचे संगोपन आणि पर्यटन यांचा समावेश असलेले मॉडेल बनवले आहे. हे ठिकाण आज देशभरातील शेतकरी, विद्यार्थी आणि पर्यटकांसाठी शिक्षण आणि प्रेरणास्थळ बनले आहे. त्यांच्या कार्याने शेतकऱ्यांना सन्मान आणि आत्मविश्वास मिळवून देण्यात मोठा वाटा आहे.राष्ट्रपती भवनातील 'अॅट होम' समारोह हा प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमानंतर होणारा एक प्रतिष्ठित कार्यक्रम असून, यात देशातील विविध क्षेत्रांतील विशेष अतिथींना आमंत्रित केले जाते. यंदा उत्तर-पूर्व भारतातील (अष्टलक्ष्मी राज्ये) हस्तकला आणि सांस्कृतिक वारसा यांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/७७७
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ३१/१२/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)काकासाहेब बात्माराम कटारे सर्व्हे नं.-८३ प्लॉट नं. ६ नं.प.मि.नं.१८-५२-६-२/१ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-५२-६-२/१ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- जालना बीड रोड
पश्चिम :गणेश जालिंदरनाथ वाघ
दक्षिण- कोर्ट रोड
उत्तरः रुमकडे जाणारा रस्ता व चांदिवाल यांची दुकान

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/६६७
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १०/११/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)प्रिती प्रकाश इंडे सर्व्हे नं.-१२ सह प्लॉट नं. ४२ (अ) सिटी सर्व्हे नं. १८६७/अ -५७ नं.प.मि.नं.१८-१११-४२ अ तसेच प्लॉट नं. ४१ (ब) सिटी सर्व्हे नं. १८६७/अ-५६ नं.प.मि.नं.१८-१११-४१ ब चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१११-४२ अ/१८-१११-४१ ब) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- ९ मिटर कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : पुण्यनगरी यांची प्लॉटींग
दक्षिण- याच प्लॉट नं. ४१ ब मधील निष्प भाग
उत्तरः किर्ती रविशंकर भडांगे यांचे प्लॉट नं ४२ अ

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

## शेकापच्या बीड जिल्हा पश्चिम विभाग चिटणीसपदी भाई बापूसाहेब साळुंके

बीड । प्रतिनिधी

शेतकरी, कामगार आणि कष्टकरी समाजाच्या हक्कांसाठी सातत्याने लढा देणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा अधिवेशन माजलगाव येथे उत्साहात पार पडले. पक्षातील संघटनात्मक फेरबदल, नव्या जबाबदाऱ्यांचे वाटप आणि पुढील कार्ययोजनेची आखणी या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन घेण्यात आला होत, बीड जिल्ह्यात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी झालेल्या चर्चेत पश्चिम जिल्हा चिटणीसपदी भाई बापूसाहेब साळुंके तर पुर्व जिल्हा चिटणीसपदी अॅड नारायण गोले पाटील यांची जिल्हा संघटनक धनंजय मुळे खजिनदार भाई अशोक रोडे यांची एकमताने निवड करण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून अखिल भारतीय मराठा महासंघाच्या माध्यमातून बापूसाहेब साळुंके यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि संघटनात्मक कार्यात मोलाचे योगदान दिले मोठा जनसंपर्क आसनारे व्यक्ती आहेत, शेतकरी, कामगार, शेतमजूर व ग्रामीण भागातील समस्यांवर त्यांनी प्रभावीपणे आवाज उठवला असून त्यांच्या कार्याचा व्यापक अनुभव पाहता त्यांची निवड निश्चित करण्यात आली.



निवड जाहीर होताच उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त करत साळुंखे यांचे अभिनंदन केले. त्यांनी पुढील कार्ययोजना जाहीर करताना संघटन मजबूत करणे, तरुण कार्यकर्त्यांना नेतृत्वात संधी देणे, शेतकरी-कामगारांच्या प्रश्नांवर आक्रमक पद्धतीने लढा देणे आणि जनजागृती मोहिमा राबवण्याचा निर्धार व्यक्त केला.

अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी मध्यवर्ती समितीचे सदस्य भाई विष्णुपंत घोलप होते प्रमुख उपस्थिती शेकापचे सहचिटणीस राज्याध्यक्ष भाई बाबासाहेब देवकर उमाकांत राठोड. राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य दिगंबर कांबळे, चंद्रकांत चव्हाण,भाई मोहन गुंड. मध्यवर्ती समिती सदस्य इम्रान शेख शिवाजी सुरवसे भाई अशोक रोडे सह प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते , प वरिष्ठांनी मार्गदर्शन केले. शासन शेतकरी व कामगारांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याची टीका करत, एकदिलाने संघटित लढ्याची गरज त्यांनी व्यक्त केली. ग्रामीण भागातील विकास, शेतमालाला हमीभाव, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण आणि अन्य महत्त्वाच्या विषयांवर पक्षाने आवश्यक तेथे कठोर भूमिका घेण्याचा इशारा ही दिला. नवनिर्वाचित जिल्हा चिटणीस भाई बापूसाहेब साळुंके यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, ''वरिष्ठांनी माझ्यावर दाखवलेला विश्वास मी कधीच तडा जाऊ देणार नाही. शेतकरी हिताचे आंदोलन करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीन. संघटन बळकट करणे आणि प्रश्न शासनापर्यंत पोहोचवणे ही माझी प्राथमिक जबाबदारी असेल. भाई बापूसाहेब सोळंके, अॅड नारायण गोले पाटील यांच्या निवडीने बीड जिल्ह्याला पक्ष वाढीसाठी काम उभं होईल, आशादायी चित्र निर्माण झाल्याने सर्वत्र स्वागत होत असून पक्ष संघटनेत नवचैतन्य निर्माण झाल्याची भावना सामान्य लोक चर्च करत आहेत. एकेकाळी सर्वाधिक विरोधी पक्ष नेता देणारा हा शेतकरी कामगार पक्ष मराठवाड्यामध्ये राज्यभर पाय रऊन होता मात्र थोडा काळ शेतकरी कामगार पक्षाचा स्थिर गतीने गेला बीड जिल्हा हा डाव्या पक्षाला मानणारा आहे त्यामुळे भविष्यामध्ये शेतकरी कामगार पक्ष संघटन मजबूत करून सर्वसामान्य शेतकरी कामगारांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेणार असल्याचे भाई मोहन गुंड राज्य चिटणीस मंडळ सदस्य शेकाप व्यक्त केले.

## रँकिंग फ्रेमवर्क मध्ये महाविद्यालयाने सहभाग घेणे काळाची गरज -प्रो.कोंका



पाटोदा। प्रतिनिधी

येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयात आणि समितीद्वारा आयोजित एक दिवशीय कार्यशाळेत ते बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी जगभरातील विविध देशांमधील होणाऱ्या उच्च शिक्षा सर्वेक्षण तसेच राष्ट्रीय संस्थागत रँकिंग फ्रेमवर्क विषयी त्यांनी सविस्तर माहिती सांगून त्याची तुलना करून निष्कर्ष सांगितले व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये याचा कसा फायदा होईल यावर प्रकाश टाकला.या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.बळीराम राख हे होते. शैक्षणिक विकासासाठी गुणवत्ता महत्वाची आहे. आज शिक्षण पद्धतीत मोठे बदल होत आहेत.शैक्षणिक योजना ठरविण्यासाठी सर्वेक्षण करणे महत्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उप प्राचार्य डॉ.सतीश माऊलगे, डॉ. अभय क्षीरसागर, प्रा.नामदेव चांगन, पर्यवेक्षक प्रा.अनिल जोगदंड,कार्यालयीन अधीक्षक अशोक पवार व समिति प्रमुख डॉ. गजानन श्रीमंगले यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. श्रीमंगले यांनी केले तर सूत्र संचालन डॉ. प्रज्ञा महेशमाळकर यांनी केले व आभार डॉ. पवनकुमार चांडक यांनी मानले.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

शुक्रवार दि.१६ जानेवारी २०२६ | ६

# बीड पालिकेत दोन्ही क्षीरसागरांना दोन्ही पंडितांनी योग्य जागी बसवले !

बीड । प्रतिनिधी

**बीड नगरपालिकेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नगराध्यक्ष विराजमान झाल्यानंतर उपाध्यक्ष पदासाठी संख्याबळ कमी असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचे सहकार्य घेऊन उपाध्यक्ष आपल्याकडे घेतले तर दुसरे क्षीरसागर डॉक्टर योगेश शिरसागर यांना सत्तेपासून दूर ठेवले एका क्षीरसागर आला सत्तेत घेऊन पदरात काहीच नाही दिले त्यामुळे आमदार विजयसिं पंडित अमरसिंह पंडित या दोघांनी दोन्ही क्षीरसागर सत्तेबाहेरच बसवल्याचे दिसून आले.**






बीड नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि भाजपा अशी तिरंगी लढत झाली यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे वर्चस्व राहिले नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमल आता पारवे विजय झाल्या यासोबतच २० नगरसेवक देखील निवडून आले त्या पाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर भाजपाचे डॉक्टर घुमरे राहिल्या आणि पंधरा पेक्षा अधिक नगरसेवक निवडून आले तर तिसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार स्मिता वाघमारे राहिले तर त्यांचेही तेरा च्या आसपास नगरसेवक विजयी झाले नगरपालिकेमध्ये उपाध्यक्ष पदासाठी सत्ताधारी माजी आमदार अमरसिंह पंडित आमदार विजयसिंह पंडित यांच्या गटाकडे पुरेशी संख्याबळ नव्हते भाजपाला विशेषता क्षीरसागर यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी त्यांना दुसऱ्या क्षीरसागराची मदत घ्यावी लागली आणि ते यात यशस्वी झाले विशेष म्हणजे उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवार सारिका क्षीरसागर यांनी माघार घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे विनोद मुळूक हे बिनविरोध विजय झाले त्यानंतर स्वीकारत सदस्यांच्या निवडी वेळी मोठा घोळ झाला आणि दोन्ही क्षीरसागर यांना काहीच मिळाले नाही असेच म्हणावे लागेल संख्याबळानुसार भाजपाला दोन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला एक आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला दोन असे सदस्य होणे अपेक्षित होते मात्र राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटांना तीन शरद पवार गटांना एक आणि भाजपाला एक असे यश मिळाले या निवडणूक निकालात महत्त्वाची बाब म्हणजे उपाध्यक्ष पदासाठी एका क्षीरसागराची मदत घेत दुसऱ्या क्षीरसागराला सत्य बाहेर ठेवले तर मदत करणाऱ्या क्षीरसागर यांना एका स्वीकारत सदस्याशिवाय दुसरं काहीही मिळालं नाही त्यामुळे पंडित बंधूंनी दोन्ही क्षीरसागर बंधूंना सत्य बाहेरच ठेवले असे म्हणावे लागेल विशेष म्हणजे उपाध्यक्ष पदाचे खरे दावेदार अमर नाईकवाडे असताना त्यांना मात्र ऐनवेळी डावलले गेले नाराज असलेले फारूक पटेल मात्र पुन्हा एकरूप झाले नाईकवाडे नंतर निजाम यांच्या नावाची चर्चा होती मात्र शेख निजाम अमर नाईकवाडे फारुख पटेल यांना शेवटपर्यंत शांतच राहावे लागले पंडितांनी एका दगडात दोन नव्हे तर अनेक पक्षी घरात केल्याचे दिसून येत आहे

## अवमान प्रकरणी राधेश्याम अट्टलसह ट्रस्टींना नोटीस

### लक्ष्मीनारायण मंदिर प्रकरणात कायदेशीर कारवाई निर्णायक टप्प्यात

बीड । प्रतिनिधी

गेवराई येथील श्री लक्ष्मीनारायण मंदिर हे नोंदणीकृत सार्वजनिक न्यास असून, या न्यासाच्या मालकीची मौजे कोल्हेर व मौजे लुकामसला येथे एकूण १२१ एकर जमीन आहे. मौजे कोल्हेर येथील जमीन सर्व्हे नं. ६ व ८ तर मौजे लुकामसला येथील जमीन सर्व्हे नं. ३३ व ३८ अशी नोंदणीकृत आहे. सदर जमीन देवस्थानच्या मालकीची असताना, तिच्या उत्पन्नाचा लाभ देवस्थानऐवजी खाजगी व्यक्तींच्या खात्यात जात असल्याचे गंभीर आरोप समोर आले होते.

या भ्रष्टाचारासंदर्भात रामनाथ खोड यांनी दिनांक २१/११/२०२५ रोजी तक्रार केली होती त्यावर धर्मदाय उप आयुक्त यांनी आदेश केले होते त्या आदेशाला मा. उच्च न्यायालयात अहवान देण्यात आले अणि मा. उच्च न्यायालयाने धर्मदाय उप आयुक्त यांच्या आदेशाला स्थगिती देऊन मा. सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बीड यांनी ०५/०४/२०२१ रोजी जो आदेश पारित झालेला आहे तो आदेश मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ०९/१२/२०२५ रोजी दिलेल्या आदेशान्वये कायम ठेवण्यात आला आहे असे असतानाही न्यायालयीन आदेशांचे पालन न करता देवस्थान जमिनीतील ◀◀ पान ३ वर

## शिक्षण विभागाच्या शाळेची दुर्दशा सीईओंनी डोळ्याने पाहिली

### विद्यार्थी २० तेही कागदावर त्यासाठी चार शिक्षक तैनात : सीईओ म्हणाले त्यांना हलवा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळेची कशी अवस्था आहे ही आज प्रत्यक्ष जिल्हा परिषदेचे सीईओ जतीन रहमान यांनी डोळ्यांनी पाहिली. जिल्हा परिषदेच्या कन्या प्रशालेत आज त्यांनी अचानक भेट दिली या शाळेवर विद्यार्थी नव्हते पण रेकॉर्डवर २१ विद्यार्थ्यांची नोंद आहे त्यासाठी चार शिक्षक नियुक्त करण्यात आले आहेत जिल्ह्यात अनेक ठिकाणी शिक्षक नाहीत म्हणून आंदोलने केली जातात मात्र जिथे विद्यार्थी संख्या कमी आहे तिथे मात्र शिक्षकांना बसून पगार दिल्या जातो ही वस्तुस्थिती शिवनी पाहिली आणि शिक्षणाधिकाऱ्यांना सांगितले यांची समायोजन दुसरीकडे करा.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जुनी पंचायत समिती कार्यालय मध्ये असलेल्या जागेची पाहणी केली तेथील परिस्थिती पाहिल्यानंतर ते थेट जिल्हा परिषद कन्या प्रशाला



च्या ठिकाणी सुरू असलेल्या फिजिओथेरपी होत असलेल्या कार्यालयात आले तेथील पाहणी केली तेथील कामाबद्दल त्यांनी समाधानी व्यक्त केले मात्र त्यानंतर शेजारीच असलेल्या जिल्हा परिषद कन्या शाळा कडे त्यांचे लक्ष गेले त्या ठिकाणी चार शिक्षक झाडाच्या सावलीला खुर्ची टाकून गप्पा मारत होते सी ओ रहमान यांनी पाहिल्यानंतर हे शिक्षक आहेत का असे विचारले त्यानंतर ◀◀ पान ३ वर

## नगराध्यक्षा पारवे यांनी नियमाला बगल देत स्वत:च्या पक्षाचे तीन सदस्य निवडले

### भाजपच्या गटनेत्या सारिका क्षीरसागर यांचा आरोप

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेच्या पहिल्याच सभेत स्वीकृत सदस्यांच्या निवडीवर भाजपने आक्षेप घेतला आहे. नियमानुसार भाजपचे दोन, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा एक सदस्य निवडले जाणे अपेक्षित होते. नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांनी नियमांना बगल देत स्वतःच्या पक्षाचे तीन सदस्य निवडून आणल्याचा आरोप भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई योगेश क्षीरसागर यांनी केला आहे. या प्रकाराविरोधात आपण बीडच्या



जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

बीड नगरपरिषदेच्या उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी गुरुवारी (दि.१५) सभेचे आयोजन करण्यात आले होते. उपनगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून विनोद मुळूक यांनी अर्ज दाखल केला होता, तर भाजपकडून डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. मात्र, आमदार ◀◀ पान ३ वर

## माजी आ.भीमराव धोंडे यांनी रामकथेचे केले श्रवण

आष्टी । प्रतिनिधी

अध्यात्म हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मनुष्याच्या अंतिम समाधानासाठी धार्मिक कार्यक्रमात सहभाग आवश्यक असून त्यातून मिळणारे समाधान हे अंतिम असते असे उद्गार आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी काढले. दरम्यान,धार्मिक कार्यात निसंकोचपणे सर्वांनी उपस्थित राहून धर्म वाढवण्यासाठी सर्वोतोपरी सहभागी व्हावे असे आवाहनही माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

आष्टी येथे आ.सुरेश धस आणि संयोजन समितीच्या वतीने संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथेच्या आयोजन करण्यात आले आहे. माजी आ.भीमराव धोंडे यांनी आष्टी शहरात श्रीराम कथेच्या मंडपामध्ये आज आवर्जून उपस्थिती लावली.रामकथेत पाचव्या दिवशी माजी आ. भीमराव धोंडे यांनी भेट देऊन संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथा निरुपणाच्या कौशल्याचे मन भरून कौतुक केले आणि या कथा आयोजकांचेही ◀◀ पान ३ वर

## बप्पाजी बाबा संस्थानवर सभामंडपाचे काम रखडले –वरिष्ठांकडे तक्रार

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील महान विचासिद्धि श्रीसंत बप्पाजी बाबा यांच्या श्रीक्षेत्र बप्पाजी बाबा संस्थान बांगरवाडा येथे मागील काही वर्षांपूर्वी खा.डॉ.प्रीतम ताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या खासदार फंडातून सभामंडप चे काम मंजूर झाले होते. लिंबागणेश चे माजी सरपंच श्री.बाळासाहेब मुळे हे सभामंडपाचे काम करत आहेत.मात्र त्या सभामंडपाचे काम अतिशय कासवगतीने चालू आहे.श्री.बाळासाहेब मुळे हे आज उद्या आज उद्या असे करत आहेत.दोन वर्षांपासून त्यांनी फरशी चे आणि कलर चे काम केलेले नाही.त्यामुळे भाविकांमध्ये त्यांच्या बद्दल प्रचंड नाराजी आहे.संबंधित विभागाचे इंजिनिअर यांच्या कडे तक्रार केली असून ते प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी येऊन गेले.मात्र तरी सुद्धा श्री.बाळासाहेब मुळे हे कामामध्ये दिरंगाई करत आहेत. संस्थानवर दिनांक ६ फेब्रुवारी



रोजी मूर्ती प्राणप्रतिष्ठा करायची आहे.जिल्ह्यातून अनेक संत महात्मे इथे येणार आहेत.परंतु श्री.बाळासाहेब मुळे हे काम करत नाहीत.फोन घेत नाहीत.फरशी आणि कलरचे काम अपूर्ण राहिलेलं आहे. त्यामुळे श्री.बाळासाहेब मुळे यांच्या बद्दल भाविकांमध्ये प्रचंड नाराजी वाढलेली आहे.हे काम जर तत्काळ केले नाही तर श्री.बाळासाहेब मुळे यांना परिसरामध्ये कुठल्याही प्रकारचे काम करू देऊ नये आणि त्यांची वरिष्ठांकडे तक्रार करण्यात येणार असल्याचे या प्रसंगी भाविक बोलले.त्यांनी सभामंडपावर टाकलेला स्लॅबमधून पण पाणी गळत असल्याने त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीमुळे पंचक्रोशी मध्ये नाराजी वाढल्याचे दिसून येते.

## एकनिष्ठेने कार्य केल्याचे प्रमाणपत्र मिळाले –उपाध्यक्ष सय्यद शाकेर

किल्ले धारूर प्रतिनिधी

अनेक वर्षापासून एक निष्ठेने राष्ट्रवादी काँग्रेसचे काम केल्यामुळे आदरणीय आमदार प्रकाश दादा सोळुंके यांनी मला उपाध्यक्ष म्हणून शहरात काम करण्याची संधी दिली आहे असे पत्रकार सय्यद शाकीर यांनी सत्कारा प्रसंगी बोलताना सांगितले.

एका पत्रकार बांधवाची शहराच्या उपनगराध्यक्षपदी निवड झाल्यामुळे ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन व चंद्रकांत देशपांडे यांनी सय्यद शाकीर यांचा सत्कार केला. याप्रसंगी बोलताना शाकीर सर म्हणाले मी अतिशय गरीब कुटुंबातून येत



असून मला आयुष्यामध्ये अशा प्रकारची सेवा करण्याची संधी मिळेल असे कधीही वाटले नव्हते. मात्र मी सतत केलेले काम व एकनिष्ठा याचे बक्षीस मला जनतेची सेवा करण्यासाठी मिळाली आहे. मिळालेल्या संधीचे सोने करण्याचा मी प्रयत्न करेन. जनसामान्याच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मी सदैव तत्पर असेल. असे सय्यद शाखेर म्हणाले. पत्रकार शाकीर यांची उत्पादक उपाध्यक्षपदी निवड झाल्यामुळे सर्वसामान्य लोकांमध्ये आनंद व्यक्त केला जात असून पत्रकार मित्रांमध्ये सुद्धा आनंदाचे वातावरण आहे.

## माजलगावच्या इतिहासात प्रथमच सुन महरीन शिफा बिलाल चाऊस नगराध्यक्षा तर सासरा साहाल चाऊस उपनगराध्यक्ष

### आ.सोळंकेचा उपनगराध्यक्षासाठी सहाल चाऊस यांना पाठींबा

माजलगाव । प्रतिनिधी

शहराच्या इतिहासात महरीन शिफा बिलाल चाऊस सुन नगराध्यक्ष तर सासरा साहाल अमेरबीन चाऊस हे उपनगराध्यक्ष झाले आहेत.माजलगाव नगरपरिषद स्वतःच्या ताब्यात घेण्यासाठी आमदार प्रकाश सोळंके यांनी आपल्या महायुतीतील इतर घटक पक्षाला सोबत न घेता एकेरी पद्धतीने माजलगाव नगर परिषदेची निवडणूक लढवली. या निवडणूक प्रचारादरम्यान त्यांच्या टार्गेटवर असणारे सहल चाऊस



सहाल यांच्यावर वैयक्तिक पातळीवर जाऊन टीका केली या केलेल्या टीकेची सहानभुती सहाल चाऊस यांना मोहनराव जगताप व बाबुराव पोटभरे यांच्या साथीने मिळाली तर आ. प्रकाश सोळंके यांनी सहाल चाऊस यांच्या सुन महरीन शिफा बिलाल चाऊस यांचा उमेदवारी अर्ज बाद करण्यापर्यंत आ. सोळंके यांनी प्रयत्न केले.पण या सर्व गोष्टीवर मात करत सहाल

चाऊस यांच्या सुनबाई महरीन शिफा ◀◀ पान ३ वर

## देशसेवेची संधी आर्मीतून मिळते–प्रा. वाघमारे

किल्ले धारूर । प्रतिनिधी

भारतीय सैन्यांच्या कर्तव्यनिष्ठेमुळे प्रत्येक व्यक्ती सुखी, समृद्ध व आनंदी जीवन जगते असे प्रतिपादन प्रा. नागोराव वाघमारे यांनी केले. राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये इंडियन आर्मी दिनानिमित्त आयोजित व्याख्यानामध्ये ते राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सी संवाद साधताना म्हणाले. भारतीय सैन्य दलामध्ये जाऊन देशाची सेवा करण्याची संधी राष्ट्रीय छात्र सेनेच्या माध्यमातून प्राप्त होते. देश सेवेसारखे पवित्र कार्य दुसरे कोणतेही नसल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे हे होते. आर्मी दिनानिमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या. भारतीय आर्मी राष्ट्रभक्ती, राष्ट्रनिष्ठा व देश सेवा या मूल्यांचे शिकवण देते असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले. याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे कॅडेट्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ. प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शिवकालीन शस्त्रप्रदर्शनास अभूतपूर्व प्रतिसाद

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार आदरणीय प्रकाशदादा सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे आयोजित भव्य शिवकालीन ऐतिहासिक शस्त्रप्रदर्शन व मर्दानी खेळ प्रात्यक्षिक कार्यक्रमास, विद्यार्थी, शिक्षक व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दोन दिवस चाललेल्या या उपक्रमाने संपूर्ण माजलगाव शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.तसेच आ.प्रकाश सोळंके यांनी पसायदान



सेवा प्रकल्पास भेट देऊन अनाथ मुलांच्या सोबत आपला वाढदिवस साजरा केला आणि या मुलांच्या भविष्यासाठी एक लाख रुपये देणगी म्हणून दिले.

तुळजाभवानी मर्दानी खेळ प्रशिक्षण व सांस्कृतिक सेवा संस्था, पुणे यांच्या माध्यमातून आयोजित या कार्यक्रमात शिवकालीन तलवारी, भाले, ढाल, कट्यार, धनुष्य–बाण यांसारख्या पारंपरिक शस्त्रांचे प्रदर्शन करण्यात आले. तसेच मर्दानी खेळांची थरारक प्रात्यक्षिके, युद्धकौशल्यांचे सादरीकरण आणि शिवकालीन इतिहासावर मार्गदर्शनपर व्याख्याने घेण्यात आली. इतिहास संशोधक व शस्त्रअभ्यासक श्री. रविंद्र भाऊसाहेब जगदाळे यांनी विद्यार्थ्यांना शिवकालीन युद्धनीती, शिस्त आणि स्वराज्याची प्रेरणा याबाबत सखोल माहिती दिली.या उपक्रमाचा मुख्य उद्देश तरुण पिढीमध्ये शौर्य, शिस्त, राष्ट्रप्रेम, सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्सुकतेने शस्त्रांची माहिती घेतली तसेच अनेक शाळांनी शैक्षणिक सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना या प्रदर्शनास भेट देण्यासाठी पाठवले.या कार्यक्रमाचे उद्घाटन मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तसेच वाल्मिकि अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष मा. अनिलभाऊ नखाते यांच्या हस्ते झाले. यावेळी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, पालक व मोठ्या ◀◀ पान ३ वर

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव
यशस्वी उद्योजक व आमचें परम स्नेही
अतुल शेठ मेहेर
यांना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा



----* शुभेच्छुक *----
राजेंद्र शेठ अग्रवाल
व्यवस्थापक हॉटेल सागर
बिअर बार अँड परमिट रूम नगर बीड रोड आष्टी

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायलयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# आज फैसला! ५२ टक्के मतदानासह १८ लाख पुणेकरांचा कौल 'ईव्हीएम'मध्ये बंद




पुणे


गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या महापालिका निवडणुकांसाठी पुणेकरांनी आपला कौल आज (शुक्रवार) मतपेटीत बंद केला आहे. शहरात सुमारे ५२ टक्के मतदान झाले असून, सुमारे १८ लाख १२ हजार पुणेकरांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. २०१७ मध्ये ५५ टक्के मतदान झाले होते. मात्र, यंदा २०१७ च्या तुलनेत मतदारांची संख्या तब्बल ९ लाखांनी अधिक आहे.शहरातील ४०११ केंद्रांवर ही मतदान प्रक्रिया तुरळक घटना वगळता शांततेत पार पडली.दरम्यान, सकाळी मतदान सुरू झाल्यानंतर काही केंद्रांवर मशिनमध्ये बिघाड झाल्याने, उमेदवार, तसेच मतदारांनी गोंधळ घातल्याचे पाहायला मिळाले त्यानंतर सुमारे २० कंट्रोल युनिट, तर ५२ बॅलेट युनिट बदलल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली.

या निवडणुकीसाठी सुमारे ३५ लाख ५२ हजार ६३७ मतदार होते. त्यातील सुमारे १८ लाख मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. या निवडणुकीसाठी तब्बल ११५३ उमेदवार आपले नशीब आजमावत असून, पुणेकरांचा कौल नेमका कोणाला, हे उद्या ( गुरुवारी) स्पष्ट होणार आहे.शहरात प्रभाग क्रमांक ९ बाणेर-बालेवाडी मध्ये सर्वाधिक ७६ हजार मतदान झाले आहे, तर सर्वात कमी मतदान प्रभाग ३९ अप्पर- सुप्पर इंदिरानगर परिसरात झाले आहे. या निवडणुकीसाठी शहरात ९०६ संवेदनशील मतदान केंद्र घोषित करण्यात आली होती.गेल्या काही निवडणुकांपासून शहरात सुरू असलेला मतदानाचा कल या निवडणुकीतही कायम होता. सकाळी साडेसात वाजता मतदान सुरू झाल्यानंतर विधानसभा लोकसभा निवडणुकीत मतदार सकाळीच बाहेर पडत असल्याचे दिसून आले. मात्र, महापालिका निवडणुकीत सकाळी साडेसात ते साडेनऊपर्यंत अवघे ६ टक्के मतदान झाले होते.त्यानंतर साडेनऊपासून मतदान केंद्रांवर गर्दी वाढण्यास सुरुवात झाल्यानंतर सकाळी साडेअकरा वाजता हा आकडा ९ टक्क्यावरून १५ टक्के झाला. त्यानंतर दुपारी दीड वाजता ११ टक्के वाढून २६.२८ टक्के मतदान झाले.दुपारी साडेतीन वाजेपर्यंत त्यात १० टक्के वाढ होऊन ३७ टक्के मतदान झाले होते. मात्र, शेवटच्या दोन तासांत तब्बल १५ टक्के वाढ झाल्याने हा आकडा ५२ टक्क्यांपर्यंत वाढला असून, एकूण २० लाख मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

मतदान केंद्राच्या बाहेर थेट पैसे वाटप सुरू असल्याने राजकीय पक्षांच्या बुथवर उभे राहण्यास जागा नसल्याची स्थिती शहरातील वस्ती भाग असलेल्या काशेवाडी, डायसप्लॉट, जनता वसाहत, वडारवाडी, पाटील इस्टेट, रास्ता पेठ, दत्तवाडी, तळजाई वसाहत परिसरात दिसून आली. अनेक पक्षांचे राजकीय कार्यकर्ते मतदारांना रिक्षातून, तसेच स्वत:च्या वाहनात घेऊन येत असल्याचे दिसून आले.याशिवाय काही ठिकाणी मतदारांना थेट भेटवस्तू दिल्याचेही चित्र होते. त्यामुळे या भागात मतदानाच्या शेवटच्या दोन तासांत केंद्रांच्या बाहेर रांगा लागल्याने पोलिसांना मोठा बंदोबस्त तैनात करावा लागला. या सर्व ठिकाणी रात्री उशिरापर्यंत मतदान सुरू असल्याचे पाहायला मिळाले.

# विठ्ठलवाडीत अतिक्रमण काढताना ग्रामपंचायत अधिकाऱ्याला धक्काबुक्की

तळेगाव ढमढेरे: विठ्ठलवाडी (ता. शिरूर) येथील शासकीय जागेवरील अतिक्रमण काढण्यासाठी गेलेल्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याला शिवीगाळ व धक्काबुक्की करण्यात आली. याप्रकरणी शासकीय कामात अडथळा आणल्याचा शिक्रापूर पोलीस ठाण्यात पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पांडुरंग भिकोबा गवारी, मारुती पांडुरंग गवारी, संगीता दीपक गवारी, सिंधुबाई वसंत गवारी व सुभद्रा पांडुरंग गवारी (सर्व रा. विठ्ठलवाडी, ता. शिरूर, जि. पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय नारायण कुंभार (वय ४९, रा. योजनानगर, लोहगाव, ता. हवेली) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय जागेवरील अतिक्रमणाबाबत संबंधितांना पूर्वीच नोटिसा देण्यात आल्या होत्या. पंचायत समितीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय कुंभार, सरपंच शंकर धुळे, ग्रामपंचायत सदस्य सागर ढमढेरे, पोलीस पाटील शरद लोखंडे, कर्मचारी प्रशांत गवारी व अक्षय आल्हाट हे ग्रामस्थ व पोलिसांच्या उपस्थितीत जेसीबीच्या साहाय्याने अतिक्रमण काढण्यासाठी गेले होते.


यावेळी पांडुरंग गवारी यांच्या घरासमोरील शासकीय जागेतील विटा काढण्यास सांगूनही त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे अतिक्रमण काढण्याची कारवाई सुरू असताना मारुती गवारी व काही महिलांनी आरडाओरडा करत थेट जेसीबीसमोर बसून कारवाईला विरोध केला. दरम्यान, पांडुरंग गवारी यांनी ग्रामपंचायत अधिकारी कुंभार यांच्यावर धाव घेत त्यांना पकडून धक्काबुक्की केली.पोलिसांनी समजावून सांगण्याचा प्रयत्न केला असता संबंधित महिला व व्यक्तींनी अधिकाऱ्यांना व सरपंचास दमदाटी करत शासकीय कामात अडथळा आणला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल चव्हाण करत आहेत.

# सावज शोधणारा स्वत:च बनला शिकार! कौलीमळा येथे सीसीटीव्हीत कैद होणारा 'तो' बिबट्या अखेर जेरबंद

अवसरी - अवसरी खुर्द (ता.आंबेगाव) परिसरातील कौलीमळा येथे पावणे दोन प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर नर जातीचा सुमारे दीड ते दोन वर्ष वयाचा बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद झाला आहे. बिबट्या जेरबंद झाला असल्याने शेतकऱ्यांनी सुटकेचा श्वास टाकला आहे.कौली मळा येथील रवींद्र वाळके यांच्या घरासमोरील पोर्चमध्ये १८ नोव्हेंबर रोजी तीन बिबटे आलेले सीसीटीव्हीमध्ये आढळले होते.

त्या नंतर वन विभागाचे वन परिक्षेत्र अधिकारी अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल प्रदीप कासारे आणि वनरक्षक शिवाजी ढोले यांच्या माध्यमातून पिंजरा लावण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा सहा डिसेंबर रोजी पुन्हा एक बिबट्या रवींद्र वाळके यांच्या घरासमोर आल्याचे आढळले होते. त्या वेळी घराच्या उत्तरेस पंचवीस फूट अंतरावर असणाऱ्या पिंजऱ्याकडे ढुंकून ही पाहिले नव्हते.

त्यानंतर तसाच तो बिबट्या घराच्या पूर्व दिशेला असलेल्या रस्त्याने गेला. त्या नंतर सात डिसेंबर रोजी म्हसोबा देवाच्या शेजारी जयसिंग बळवंत भोर यांच्या शेतात पिंजरा हलवण्यात आला. त्यात गेले सव्वा



महिने त्यात बिबट्या अडकला नव्हता. तीन दिवसांपासून अशोक वाळके यांच्या शेतात धनगरांचा वाडा होता. त्यामुळे बिबट्या आला असावा आणि भक्ष्याच्या शोधात पिंजऱ्यात अडकला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

सकाळी सातच्या सुमारास जोरजोरात आवाज येत असल्याचे धनगरांच्या लक्षात आले. त्यांनी पाहिले असता त्यात बिबट्या अडकल्याच दिसून आले. त्यांनी स्थानिक शेतकऱ्यांना माहिती दिली. अजून या परिसरात एक मोठा आणि आणि एक छोटा बिबट्या आहे. त्यालाही जेरबंद करावे, अशी ग्रामपंचायत सदस्य जगदीश अभंग यांनी केली आहे.


सावज शोधणारा स्वत:च अडकला

कौलीमळा येथे रवींद्र वाळके यांच्या घरी दोन महिन्यात तीन वेळा बिबट्या आढळला. बुधवारी, दि. १४ रोजी पहाटे एक वाजून चाळीस मिनिटांनंतर पुन्हा एकदा बिबट्या येऊन गेल्याचे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले आहे. वाळके यांच्या घरी १८ नोव्हेंबर रोजी तीन बिबटे आले होते. त्या नंतर सहा डिसेंबर रोजी पहाटे साडे चार वाजता एक बिबट्या घरच्या पश्चिमेकडून आला होता.

बुधवारी पहाटे पुन्हा एकदा एक वाजून चाळीस मिनिटाने बिबट्या जुन्या घराच्या अंगणातून नवीन बंगल्याच्या आवारात येऊन पश्चिमेला सुमारे वीस मिनिटे ठाण मांडून बसला होता. तो आला, थांबला पाहिले आणि ठाण मांडून बसला. स्वत:साठी सावज शोधण्याच्या नादात स्वत:च पिंजऱ्यात अडकला.

# भामा नदीवरील 'हे' दोन महत्त्वाचे पूल वाहतुकीसाठी बंद; आता 'या' पर्यायी मार्गांचा वापर करा

आंबेठाण - खेड तालुक्यातील भामा नदीवर असलेले शेलू ते कुरकुंडी आणि कोरेगाव खुर्द ते कोरेगाव बुद्रुक या गावांना जोडणारे कोल्हापूर पद्धतीचे दोन बंधारे व त्यावरील पूल जीर्ण झाल्याने तेथील अवजड वाहतूक तातडीने बंद करण्यात आली आहे. पाटबंधारे विभागाने सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेतला असून, यामुळे अवजड वाहनचालकांना आता मोठा वळसा घालून प्रवास करावा लागणार आहे.



कोरेगाव खुर्द आणि बुद्रुक दरम्यानचा बंधारा सुमारे ३० वर्षांपूर्वी उभारण्यात आला होता. हा बंधारा सध्या अत्यंत कमकुवत झाला असून, काही महिन्यांपूर्वी त्याच्या भरावाचा भागही ढासळला होता. एमआयडीसी भागात जाण्यासाठी कामगार, शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. शेलू येथील बंधाराही अवजड वाहतुकीसाठी धोकादायक ठरत असल्याने, तेथूनही जड वाहनांना मनाई करण्यात आली आहे.

नागरिकांना आता तळशेत ते धामणे किंवा पुणे-नाशिक महामार्गाचा वापर करावा लागणार असून, यामुळे वेळ आणि इंधनाचा अपव्यय होणार आहे.या संदर्भात तहसील कार्यालय आणि पोलीस प्रशासनाला लेखी पत्राद्वारे कळवण्यात आले आहे. सद्यस्थितीत या दोन्ही पुलांवरून केवळ दुचाकी आणि हलक्या वाहनांनाच परवानगी देण्यात आली आहे.

अशी माहिती सहाय्यक अभियंता अश्विन पवार, शाखा अभियंता शुभम सुसुंद्रे आणि कालवा निरीक्षक वसंत ढोकरे यांनी दिली आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होणार असली तरी अपघाताचा धोका टाळण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे.

तत्काळ मोठे व रुंद पूल उभारण्याची गरज

मागील अनेक वर्षांपासून भामा नदीच्या दोन्ही तीरावर असणारी दोन खोरी जोडण्यासाठी मोठा पूल उभारावा अशी मागणी केली जात आहे. पावसाळ्यात देखील या पुलांवरून पाणी गेल्याने हे पूल अनेक वेळा वाहतुकीसाठी बंद ठेवले जातात. सध्या अस्तित्वात असणारा धामणे येथील पूल आणि त्यानंतर भाम येथील पूल अशा दोनच मार्गावरून नागरिकांना आता अवजड वाहनांचा प्रवास करावा लागणार आहे.त्यामुळे नागरिकांची मोठी अडचण होणार आहे. त्यामुळे शासनाने तत्काळ या मार्गांना पर्यायी पूल म्हणून मोठे आणि रुंद पूल उभारण्याची गरज आहे. विशेषतः कोरेगाव रस्त्याने मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. किमान हा पूल तरी तत्काळ दुरुस्त करून अधिक रुंद करावा अशी मागणी ग्रामस्थांनी जोर धरली आहे.

# यवत परिसरात महामार्गावर उभ्या ट्रकमधून ८१० लिटर डिझेलची चोरी

खुटबाव: दौंड तालुक्यातील यवत परिसरात महामार्गाच्या कडेला उभ्या तीन मालवाहू ट्रकमधून ७० हजार ४७० रुपये किमतीच्या ८१० लिटर डिझेलची चोरी झाल्याची घटना मंगळवारी (दि. १३) रात्रीच्या सुमारास घडली.

याबाबत ट्रकचालक नूर मकबुल इस्लाम (वय २७, रा. चांदपूर, ता. उत्तर लक्ष्मीपूर जि. मालडा-उत्तर प्रदेश) यांनी यवत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

अधिक माहितीनुसार, नूर इस्लाम आणि राजू पाल हे दोघे पुणे-सोलापूर महामार्गाने मालवाहू ट्रक (एमएच ४३ सीक्यू १८२२) आणि एमएच ४३ सीक्यू २२०२ हे पनवेल-मुंबई येथून टेंभुर्णी एमआयडीसीमध्ये माल भरण्यासाठी निघाले होते.

रात्र झाल्यामुळे ते यवत गावच्या हद्दीतील रॉन्ड ४५ या हॉटेलजवळ आराम करण्यासाठी थांबले होते. या वेळी चोरट्यांनी दोघांच्या ट्रकमधून ५६० लिटर डिझेल काढून चोरी केली. तसेच सहजपूर हद्दीत असलेल्या सिंधू पंजाबी ढाब्याच्या पार्किंगमध्ये उभ्या जाफर रहिम सुमरा (रा. कच्छपुच्छ, ता. भुज जि. कच्छ) यांच्या ट्रक (जीजे १८ ए झेड ९३९९) मधूनही २५० लिटर डिझेलची चोरी केली.

यातून चोरट्यांच्या टोळीने एका रात्रीत तीन मालवाहू ट्रकमधून ७० हजार ४७० रुपये किमतीच्या ८१० लिटर डिझेलची चोरी केल्याचे पुढे आले. यापूर्वी महामार्गाच्या कडेला थांबलेल्या ट्रकमधून डिझेलची चोरी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. मालवाहू ट्रकमधून डिझेलची चोरी करणारी टोळी सक्रिय असून, अशा चोरांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

# आंबेगावात भाजपचा मोठा धमाका! जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी 'स्वबळा'चा नारा

मंचर । प्रतिनिधी

आंबेगाव तालुक्यात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पक्ष स्वबळावर लढणार असल्याची घोषणा भाजप पक्षाचे नेते जयसिंग एरंडे यांनी बुधवार, दि.१४ रोजी केली.मंचर-निघोटवाडी येथे झालेल्या पत्रकार परिषदेला भाजपचे सरचिटणीस डॉ.ताराचंद कराळे,भानुदास काळे,विजय पवार,प्रमोद बाणखेले,संदीप बाणखेले,अरविंद वळसे पाटील,राजेश काळे यांच्या सह मान्यवर उपस्थित होते.

भाजपचे नेते जयसिंग एरंडे म्हणाले की पक्षाने माझी आंबेगाव निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे.जिल्हा परिषदेच्या पाच व पंचायत समितीच्या १०, अशा एकूण पंधरा जागांसाठी जवळपास ७० ते ७५ उमेदवारांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली आहे.

त्यामुळे पक्ष पक्षाच्या नियमानुसार योग्य त्या उमेदवारास उमेदवारी देऊन त्याच्या पाठीमागे ताकद देऊन त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अरुण गिरे हे भाजपमध्ये आले तर त्यांचे आम्ही स्वागत करू.असे त्यांनी सांगितले.

# 'पुणे बार असोसिएशन' निवडणूकीचे अंतिम चित्र स्पष्ट; अध्यक्षपदासाठी तिरंगी लढत, 'या' दिवशी होणार मतदान

पुणे - वकिलांची शिखर संघटना असलेल्या पुणे बार असोसिएशनच्या वार्षिक निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट झाले आहे. यंदा अध्यक्ष पदासाठी तिरंगी लढत होणार आहे. गीतांजली बालवडकर, काळुराम भुजबळ आणि विशाल शिवले यांच्यात ही निवडणूक होणार आहे. शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात ६ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, त्याच दिवशी रात्री मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

उपाध्यक्ष पदाच्या ३ जागांसाठी तब्बल आठ जण नशिब अजमावत आहेत. यामध्ये, सर्वसाधारण प्रवर्गातील दोन जागांसाठी समीर बेलदरे, प्रविण देशमुख, श्रीकांत काळभोर, प्रतापराव मोरे आणि कांताराम नप्ते हे रिंगणात आहे. तर, महिला राखीव प्रवर्गात निता भवर, प्रितीसिंह परदेशी, पुनम साळुंखे यांच्यामध्ये लढत होणार आहे. सचिव पदासाठी सर्वसाधारण प्रवर्गातील दोन जागांसाठी श्रीकांत बनसोडे, सम्राट जांभुळकर, विजय लेंगरे, अभिजित पोळ, गणेश थरकुडे हे रिंगणात आहे.तर, महिला राखीव प्रवर्गातून एका जागेसाठी नेहा जांभळे आणि वृषाली सुर्यवंशी यांच्यामध्ये सामना रंगणार आहे. खजिनदार पदासाठी अंजली बांदल आणि अतुल हरपळे यांच्यामध्ये लढत होणार आहे. हिशोब तपासणीच्या एका जागेसाठी सर्वासाधारण प्रवर्गातून शिवराज निंबाळकर आणि हर्षवर्धन राऊपाटील तर महिला राखीव प्रवर्गातून तेजवंती कपले आणि पुजा पवार हे निवडणूक रिंगणात आहेत.

पुणे बार असोसिएशनच्या पंधरा कार्यकारिणी सदस्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. महिलांसाठी तीस टक्के आरक्षण लागू झाल्यानंतर पुर्वीची दहा सदस्यांची कमिटी आता पंधरा झाली आहे. त्यांपैकी दहा जागांवर पुरूष तर उर्वरित पाच जागांवर महिला उमेद्वार निवडून आल्या आहेत.सर्वसाधारण गटातून मयुर मराठे, विकास जाधव, उमेश मांजरे, प्रितेश दळवी, योगेश जैन, अनिल हुडे, अमोल वडगणे, उदय शेलार, प्रज्वल गुंजाळ आणि आकाश भिलारे यांची निवड झाली आहे. तर, महिला राखीव गटातून संध्या रायबोले, शितल देशमुख, गुंजन भोसले, स्मिता वाघमारे आणि प्रियंका घाडगे यांची निवड झाली आहे.

# राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष जय पाटील यांचा राजीनामा

**बारामती । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बारामती शहराध्यक्ष जय पाटील यांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे त्यांच्या पदाचा राजीनामा सुपूर्द केला. कार्यकाळ संपल्याने व नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर आपण शहराध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असल्याचे जय पाटील यांनी स्पष्ट केले.

शहराध्यक्ष पदाची धुरा हातात येताच जय पाटील यांनी शहरात कामाचा झंजावात सुरू ठेवला होता. पक्ष संघटन वाढीसाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीवेळी त्यांनी कामाच्या माध्यमातून लक्ष वेधले होते. युवकांचे संघटन मजबूत करत पक्षाला बळ देण्याचे काम त्यांनी त्यावेळी केले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त महारक्तदान शिबिरांचे आयोजन करून हजारो बाटल्या रक्त संकलित करण्याचे काम केले. यामुळे शहरातील युवक आरोग्य सेवेसी जोडला गेला.

रक्तदान शिबिराबरोबरच शहरात आरोग्य शिबिरे घेतली त्याला बारामतीकरांनी चांगला प्रतिसाद दिला. पाटील शहराध्यक्ष झाल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पाठपुरावा



करत त्यांनी राष्ट्रवादी शहर कार्यालय नव्याने बांधले. त्यामुळे शहरात पक्ष संघटनेला ऊर्जेत अवस्था प्राप्त झाली. लोकसभा विधानसभेवेळी एक तास राष्ट्रवादीसाठी हा उपक्रम संपूर्ण शहरात राबविण्यात आला. त्यामध्ये प्रत्येक प्रभागात जाऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. त्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले.

या उपक्रमाच्या माध्यमातून राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांमधील समन्वय वाढण्यास मदत झाली. नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर देखील राष्ट्रवादी पुन्हा हा उपक्रम राबविण्यात आला. त्यामध्ये प्रभाग दौरे झाले. मुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात बारामती शहरात झालेली विकास कामे व भविष्यातील व्हिजन नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मदत झाली. लोकसभा निवडणुकीनंतर बारामती शहर व तालुक्यातील कार्यकारणी बदलण्याचा घाट घातला गेला त्यानंतर देखील जय पाटील यांच्यावर अजित पवार यांनी शहराध्यक्ष पदाची जबाबदारी कायम ठेवली.त्यांच्या कार्यकाळात त्यांनी मोठ्या प्रमाणात सभासद व मतदारा नोंदणी देखील केली.शहराध्यक्ष म्हणून जय पाटील यांनी केलेल्या कामाचा उल्लेख त्यांनी अनेक वेळा केला. असे असले तरी देखील कार्यकाळ संपल्याने व नगरसेवक पदी निवड झाल्याने जय पाटील यांनी शहराध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असल्याचे स्पष्ट केले.संघटनेमध्ये काम करत असताना ज्या विद्यार्थी युवकांनी महिला पदाधिकाऱ्यांनी जी साथ दिली त्याबद्दल जय पाटील यांनी सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

# दौंड पोलीस ठाण्यासमोरच कोयत्याने प्राणघातक हल्ला

**दौंड । प्रतिनिधी**

**दौंड शहरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव अस्वस्थता पसरली असून, गुन्हेगारांवरील पोलिसांचा धाक पूर्णपणे संपल्याचे चित्र दिसत आहे. चक्क दौंड पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारासमोर कोयत्याने प्राणघातक हल्ला होऊनही पोलिस यंत्रणा निष्क्रिय राहिल्याने त्यांच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

सोमवारी (दि. १२) दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास पुणे जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) शी संबंधित आफताब जुनेद सय्यद (वय २३, रा. फौजदार चाळ) या युवकावर घरगुती कारणावरून कोयता तसेच लाथा-बुक्क्यांनी प्राणघातक हल्ला करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे ही घटना पोलीस ठाण्याच्या अगदी समोर घडली. तरीही घटनास्थळी उपस्थित असलेल्या नागरिकांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली; कुणीही युवकाला सोडवण्यासाठी पुढे आले नाही. पोलीस ठाण्यासमोरच, तेही दिवसाढवळ्या अशा प्रकारचा हल्ला होत असेल तर शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर पोलिसांचे नियंत्रण नेमके कुठे आहे? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, एवढी गंभीर घटना घडूनही 'तक्रार नाही' या कारणावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही. पोलीस ठाण्याच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत हा प्रकार कैद झाला असण्याची शक्यता असतानाही पोलिसांनी मौन बाळगल्याने राजकीय दबावाखाली कारवाई टाळली जात असल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

दौंड शहराची वाटचाल 'बिहार पॅटर्न'कडे सुरू असल्याची भावना आता उघडपणे व्यक्त होत आहे. खुलेआम भांडणे, मारामाऱ्या, अवैध धंदे आणि राजकीय आश्रयामुळे गुन्हेगारांवर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई केली जाईल, असे जाहीरपणे सांगितले होते. मात्र, निवडणुका व निकाल लागूनही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसून येत नाही. यामागे नेमका कोणता 'गौडबंगाल' आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी पदभार स्वीकारल्यानंतर दोनवेळा दौंड शहराला भेट दिली. मात्र, स्थानिक पत्रकारांशी संवाद टाळला. कोयता गँग, अवैध धंदे आणि वाढती गुन्हेगारी यावर पोलीस प्रशासन बोलण्यास कचरते आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वेळीच ठोस आणि निर्भीड कारवाई झाली नाही तर दौंड शहरात एखादी मोठी अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे घडल्यास त्याची जबाबदारी पूर्णपणे पोलीस प्रशासनावर राहील, अशी तीव भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

दूरध्वनी दोन महिन्यांपासून बंद

दरम्यान, दौंड पोलीस ठाण्याचा दूरध्वनी गेल्या दोन महिन्यांपासून बंद असल्याचे समोर आले आहे. नागरिकांनी विचारणा केली असता, 'वर तक्रार केली आहे' एवढेच उत्तर मिळत आहे. शहरात सतत भांडणे, मारामाऱ्या व चोरीच्या घटना घडत असताना नागरिकांनी तक्रार करण्यासाठी नेमका कोणत्या क्रमांकावर संपर्क साधायचा, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नुकताच पाटस रोडवरील हॉटेल जगदंबा येथे गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन १० जण जखमी झाले. या घटनेची माहिती पोलिसांना भमणध्वनीवर देण्यात आली. मात्र, पोलीस ठाण्याचा दूरध्वनी बंद असल्याने माहिती उशिरा मिळाल्याचे बोलले जात आहे. भविष्यात अशा घटनांचे गांभीर्य लक्षात घेता पोलिसांनी अधिक सतर्कता दाखवणे अत्यावश्यक आहे.